साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
वर्ष 31 वे
| परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख
संस्थापक संपादक : डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर, मो.९४२३३३७४८०
| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com
नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक १३८ | पाने-१२ | दि.१८/८/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ३ रु.




# करमाळा तालुक्याच्या विकासासाठी रिटेवाडी उपसासिंचन योजना राबवणार : माजी आमदार पाटील



आपण एक समाजसेवक असून सत्ता असो अथवा नसो, मतदारसंघातील जनतेची सेवा करणे हे आपले काम आहे. कोणतेही काम घेऊन येणाऱ्या नागरीकांना आपण दिलासा देत आहोत. तसेच माझे सहकारी आलेल्या माणसांची कामे पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करतात. तालुक्यातील एमआयडीसी पूर्ण क्षमतेने चालविण्यासाठी आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली आहे. त्याचा पाठपुरावा करून करमाळा बरोबरच केम येथील एमआयडीसी सुरू करून मोठा प्रकल्प आणणे व युवकांच्या हाताला काम देणे यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. ...नारायण (आबा) पाटील (माजी आमदार-करमाळा)

करमाळा : करमाळा तालुक्याच्या संपूर्ण विकासासाठी रिटेवाडी उपसासिंचन योजना ही अत्यंत उपयुक्त असून राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून ही योजना मंजुर करण्यासाठी आपण प्रयत्न करत आहोत; असे माजी आमदार नारायण पाटील यांनी सांगितले.

२३ ऑगस्टला माजी आमदार पाटील यांचा वाढदिवस असून त्यानिमित्ताने सा.कमलाभवानी संदेशशी ते बोलत होते. पुढे बोलताना म्हणाले, की करमाळा तालुक्यासाठी कुकडीचे पावणेसहा टीएमसी पाणी राखीव ठेवलेले आहे. प्रत्यक्षात मात्र अर्धा टीएमसी सुध्दा पाणी या तालुक्याला मिळत नाही. कुकडी धरणापासून करमाळा तालुका हा जवळपास २५० किलोमीटर अंतरावर असल्याने हे पाणी मिळत नाही. त्यामुळे रिटेवाडी उपसासिंचन योजना ही उजनीवरून अत्यंत उपयुक्त व तातडीने होणारी योजना आहे. शासनाने पावसाळ्यात चार महिने वाहून जाणारे पाणी रिटेवाडी उपसासिंचन योजनेतून घेण्यास परवानगी दिल्यास त्यातून शेतकऱ्याचा फायदा होईलच पण भविष्यातील कृष्णा-भीमा स्थिरीकरणानंतर ही योजना बारा महिने चालवून तालुका पूर्ण बागायत होवू शकतो. याबरोबरच सध्याच्या शासनाच्या माध्यमातून तालुक्यातील अनेक रस्त्याची कामे मार्गी लावली आहेत. करमाळा तालुक्यातील अजुनही वीजेचा मोठा प्रश्न आहे. तसेच प्रशासकीय सेवेतील अनेक कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे तालुक्याच्या प्रगतीवर होत आहे. ही बाब आपण वरीष्ठांच्या निदर्शनास आणून रिक्त जागा भरण्यासाठी विनंती केली असल्याचेही माजी आमदार पाटील यांनी सांगितले.



गावाच्या विकासासाठी विशेष नियोजन केलेतरच प्रगती होवू शकते.

संपादकीय.........................................!

# 'स्मार्ट व्हीलेज' फक्त फार्स !

सन २०१५ मध्ये देशभर 'स्मार्ट सीटी' हा विषय गाजत होता. त्यानंतर दोन वर्षांनी 'स्मार्ट व्हीलेज' हा विषय गाजू लागला. शासनाने काही शहराला स्वतंत्र निधी दिला, काही उपक्रम राबवले. तसे शासनाचे धोरण चांगले आहे. शहरं आणि गावं अधिक सुंदर व स्वच्छ व्हावीत हा त्यामागचा उद्देश होता. त्याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. पण गेल्या पाच वर्षात 'स्मार्ट सीटी' आणि 'स्मार्ट व्हीलेज' ही संकल्पना हरवून गेली आहे. ना शासनाच्या, ना पदाधिकाऱ्याच्या, ना अधिकाऱ्याच्या लक्षात. सर्वजण आपणाला काय करायचे हे पुर्ण विसरले आहेत. मागे केंद्रशासनाने काही मंत्र्यांना, खासदारांना व आमदारांना गावे व शहरे दत्तक दिली होती, पण कोठेच काही झाले नाही. अन्यत्र फारसे अधिकारवाणीने सांगता येणार नाही पण करमाळा तालुक्यात मात्र काहीच झाले नाही.

करमाळा तालुक्यातील करमाळा शहर हे म्हणायला शहर आहे. करमाळा हे अर्धवट खेडे आणि अर्धवट शहर आहे. अन्य गावे ही खेडीच आहेत. वास्तविक पाहाता शहर आणि खेडी यात अजुनही खुप मोठे अंतर आहे. खेडी वर्षानुवर्षे अविकसीत राहिली आहेत आणि शहरात निदान प्राथमिक गरजा तरी दिल्या जातात. शहरामध्ये वीज, पाणी, रस्ते, गटारी, स्वच्छतागृहे ,सर्व काही देण्याचा प्रयत्न असतो. या उलट खेड्यात प्यायला पाणी नाही. शहरात वरच्या मजल्यावर पाणी आले नाही, थोडावेळ वीज गेलीतर गहजब होतो. खेड्यात अजुनही काही गावात किमान एक-दीड किलोमीटर अंतरावरून दोन-दोन हांडे डोक्यावर येऊन महिलांना पाणी आणावे लागते. खेड्यात जलशुद्धीकरण ही काय भानगड आहे हेच माहित नाही. गावा-गावात वीजेचा तर भरवसाच नसतो. खरंतर वीज, रस्त्यावरील दिवे, रस्ता आणि गटारी या खेड्यात चैन भासू लागल्या आहेत. त्यानुसारच त्याची उपलब्धता दिसून येते. शौचालये गावात आणि रहिवास शेतात अशी खेड्यांची स्थिती आहे. हागणदारीमुक्त झालेल्या गावाचा आढावा घेतला तर आजही रस्त्याच्या कडेने लोक शौचालयाला बसलेले दिसतात.सोयीनुसार लोक वस्त्यावर रहात आहेत. त्या वस्त्यांना ना वीज, ना पाणी, ना गटारी, ना रस्ता, ना शाळा सर्वच काही अलबेल आहे. हे काम जिकीरीचे आहे त्यामुळे शासन किंवा ग्रामपंचायत काही करत नाहीत.

या तालुक्यात सध्या १०८ ग्रामपंचायती अस्तित्वात आहेत. त्याला पुरेसे ग्रामसेवक नाहीत. सध्या ९६ ग्रामसेवकाची पदे मंजूर आहेत. तर प्रत्यक्षात ७५ पदे भरली असून २१ पदे रिक्त आहेत. म्हणजे ७५ जण १०८ ग्रामपंचायतीचा कारभार चालवतात. या सर्व ग्रामसेवकांची किती कसोटी असेल; याचा विचार केलेला बरा ! याशिवाय ग्रामपंचायतीचा कारभारही मोठा गंमतीशीर आहे. देवळाली-खडकेवाडी, पोथरे-निलज, कुंभारगाव-घरतवाडी , खातगाव नं.१, खातगाव नं.२ व खातगाव नं.३ ही तीनही गावे वेगवेगळ्या ठिकाणी आहेत. साधरणत: ५०० मतदान असलेल्या गावाला स्वतंत्र ग्रामपंचायत देण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यानुसार आळसुंदे, हिवरवाडी,भिवरवाडी,ढोकरी,गोयेगाव, जेऊरवाडी, रामवाडी, रिटेवाडी, रोशेवाडी, तरटगाव अशा छोट्या गावांना स्वतंत्र ग्रामपंचायती आहेत. पण पोथरे-निलज, म्हसेवाडी-अर्जुननगर, देवळाली-खडकेवाडी, सोगाव (पुर्व) - सोगाव (प.), वडगाव (द.)-वडगाव(उ.), विहाळ-नाळेवस्ती, कोर्टी-कुस्करवाडी-गोरेवाडी-हुलगेवाडी, रावगाव-शेळकेवस्ती-वाघमारेवस्ती-धकटवस्ती, करंजे-भालेवाडी, कुंभारगाव-घरतवाडी, केत्तूर नं.१ - केत्तूर नं.२, वंजारवाडी-कुरणवस्ती, चिखलठाण नं.१-चिखलठाण नं.२, सांगवी नं.१- सांगवी नं.२, गुलमरवाडी-भगतवाडी, लिंबेवाडी-राखवाडी अशा ग्रुप ग्रामपंचायती आहेत. यामध्ये दोन तोटे आहेत. एक म्हणजे जे गाव मोठे असते त्यांचे सदस्य जास्त असतात. ते छोट्या गावाच्या सदस्याकडे व गावाकडे लक्ष देत नाहीत. जोडलेल्या गावाच्या विकासासाठी मोठे गाव प्रयत्न करत नाहीत. त्यामुळे वर्षानुवर्षे छोटी गावे अन्याय सहन करत आलेली आहेत. तसेच सोगाव पुर्व व पश्चिम यांचा भौगोलीकदृष्ट्या मेळ लागत नाही. तीच स्थिती वडगाव (दक्षिण) व वडगाव (उत्तर) यांचा मेळ लागत नाही. तीच स्थिती सांगवी नं.१ व २ या गावांवर वर्षानुवर्षे अन्याय झालेला आहे व छोटी गावे हे सहन करत आहेत. बिटरगाव येथील पाटीलवस्ती ही वांगीत युसडली आहे. त्यांचा ना गावाशी संपर्क, ना ग्रामपंचायतीशी संपर्क. आणखी एक बाब म्हणजे एक ग्रामसेवक अशा विस्कळीत गावात कशी कामे करणार ? ग्रामपंचायत एकच पण गावा-गावातील चार ते दहा किलोमीटर अंतरात ग्रामसेवक कसे जाणार ? आणि लोक ग्रामसेवकाला कसे भेटणार ? शासकीय योजना कशा राबवल्या जाणार ? सर्वांना समान न्याय कसा देणार..?

पिण्याचे पाणी, रस्ते, दिवे, गटारी मिळणारे अनुदान आणि गावांचा मोठा पसारा त्यामुळे कामाचा मेळच लागत नाही.शासनाच्या योजना सुध्दा या गावात पोहोचू दिल्या जात नाहीत तसेच अधिकारीही छोट्या गावात जात नाहीत. त्यामुळे खेडी स्वयंपुर्ण झाली पाहिजे असे म्हटले जाते, पण प्रत्यक्ष तसे वातावरण नसेलतर खेडी स्वयंपुर्ण कशी होतील..?

खेड्यातीले प्रश्न वेगवेगळे आहेत. उजनी भागात दोन गावांना जोडण्यासाठी लाँच सेवेची गरज आहे. गावा-गावांना जोडणारे रस्त्याची आवश्यकता आहे. जलशुध्दीकरण केंद्रातून पाणी पुरवठा केला पाहिजे, गावांसाठी झालेली सिंगलफेज वीज वाड्यावस्त्यावर २४ तास दिली पाहिजे. याशिवाय सध्या तालुक्यातील गावागावामध्ये शेतात जाणारे रस्ते आणि आडवलेल्या पाईपलाईन हे वाद उफाळून आलेले आहेत. याकडे लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे. सध्या पावसाळ्यात दुष्काळ आहे. त्यामुळे बहुतांशी विहीरी, नालाबंडीग, तलाव याचे पाणी कमी होत आहे. त्यामुळे जर लवकर पाऊस आला नाहीतर पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न भेडसावणार आहे, जनावरे जगवण्याचा प्रश्न आहे. त्यांचे चारापाणी कसे व कोठून मिळवणार, फळबागा कशा जगवणार..? असे प्रश्न आहेत. या स्थितीत 'स्मार्ट व्हिलेज' ही संकल्पना कशी राबवणार..? वाड्यावस्त्यांना सुविधाच नाहीत. त्यासुविधा देण्यासाठी योग्य नियोजनाची गरज आहे. वास्तविक पाहता कृषीप्रधान देश म्हणून सांगताना शेतकऱ्यांनाच सुविधा दिल्या जात नाहीत म्हणून आपली प्रगती नाही. प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतात वाहन पोहचेल असा रस्ता शासनाने दिल्यास दूध व्यवसाय, कुकटपालन, शेळी-मेंढीपालन, भाजीपाला, रेशीम उत्पादन, योंगडी उत्पादन हे व्यवसाय जोरात सुरू होतील व शेतकरी सक्षम उभा राहिल.

स्मार्ट सीटीला ज्या सुविधा द्यायच्या त्या द्या, पण खेड्यातही माणसं राहतात याची आठवण ठेवून त्यांच्याबरोबर 'स्मार्ट व्हीलेज' हे अभियान शासनाने पुर्णपणे राबवले पाहिजे. केवळ गावे दत्तक देवून हे प्रश्न सुटणार नाहीत. सध्यातरी 'स्मार्ट व्हिलेज कुठंय ?' हाच प्रश्न करमाळा तालुकावासियांसमोर आहे.

## वाशिंबे रेल्वे बोगदा पुल ते भैरवनाथ मंदिर पाणंद रस्ता मंजुर : प्रा.रामदास झोळ



करमाळा(सं.प्र.) : वाशिंबे गावातील वाशिंबे रेल्वे बोगदा पुल ते भैरवनाथ मंदिर हा पाणंद रस्ता नसल्याने ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत होती. हा प्रश्न बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित असल्याचे प्रा.रामदास झोळ यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी या रस्त्याचा प्रस्ताव शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांच्या माध्यमातून सदर प्रश्न मार्गी लावण्यासाठी रोजगार हमी फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे यांच्याकडे पाठपुरावा केले. तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मातोश्री ग्राम समृध्दी पाणंद रस्ते सहमती योजनेतून विषय उपस्थित करून सदर पाणंद रस्ता मंजूर करून घेतला आहे. त्यामुळे वाशिंबे रेल्वे बोगदा पुल ते भैरवनाथ मंदिर पाणंद रस्त्याचा प्रश्न कायम स्वरूपी सुटला असून प्रा.रामदास झोळ यांच्या प्रयत्नाला यश आले आहे. याकामी शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांचे बहुमोल मार्गदर्श व सहकार्य लाभले आहे.

## ऊसबिलासाठी युवासेनेचे उपोषण तहसीलदारांच्या आश्वासनानंतर मागे



करमाळा(सं.प्र.): करमाळा तालुक्यातील कारखानदारांनी शेतकऱ्यांची ऊसबिले द्यावी आणि शेतकऱ्यांना अतिवृष्टीचे अनुदान मिळावे; या मागणीसाठी युवासेना तालुका प्रमुख शंभुराजे फरतडे यांनी तहसील कार्यालय समोर उपोषण सुरू केले होत. तहसीलदार विजयकुमार जाधव यांच्या आश्वासनानंतर सदरचे उपोषण मागे घेण्यात आले; अशी माहिती ठाकरे गटाचे युवा सेना तालुका प्रमुख शंभुराजे फरतडे यांनी दिली. प्रशासनाकडून देण्यात आलेले आश्वासन पाळले नाहीतर तहसील कार्यालय समोर आत्मदहन करण्याचा इशाराही फरतडे यांनी दिला आहे. थकलेली ऊसबिले, अतिवृष्टी अनुदान, करमाळा, कोर्टी, केत्तूर मंडलातील शेतकऱ्यांच्या सततच्या पावसात समावेश करून नुकसान भरपाई द्यावी. तसेच पीएम किसान सन्मान योजनेतील लाभार्थ्यांची हेळसांड थांबवावी; या मागणीसाठी युवा सेना विस्तारक उत्तम आयवळे, शिवसेना माजी तालुका प्रमुख शाहूराव फरतडे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाप्रमुख शंभुराजे फरतडे यांनी १४ ऑगस्ट रोजी तहसील कार्यालय समोर उपोषण सुरू केले होते.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)



जनतेचे आमदार
माजी संचालक, आदिनाथ कारखाना
श्री.धुळाभाऊ कोकरे
उपमुख्यमंत्री, म.राज्य
कर्तव्यदक्ष माजी आमदार
मा.श्री.नारायण(आबा) पाटील
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा...
23 ऑगस्ट
शुभेच्छुक
सौ.तेजस्विनी दयानंद कोकरे
माजी सरपंच, ग्रामपंचायत कुगाव
सौ.तेजस्विनी दयानंद कोकरे




विकासरत्न
हिंदूहृदयसम्राट
कर्मयोगी
मुख्यमंत्री
विधानपरिषद सदस्य
युवक नेते
युवा नेते
माजी सभापती, पं.स.
करमाळा तालुक्याचे माजी आमदार
मा.नारायण(आबा)
गोविंदराव पाटील
23 ऑगस्ट
आपणांस वाढदिवसानिमित्त
हार्दिक
शुभेच्छा !
शुभेच्छुक
श्री.गहिनीनाथ ननवरे (माजी सभापती, पंचायत समिती करमाळा.)

# तरूणांनी जागृत राहून ध्येय प्राप्त करावे : प्रा.वलटे



करमाळा(सं.प्र.) : तरूणांनी जागृत राहून आपले ध्येय साध्य केले पाहिजे. त्याकरीता खूप कष्ट करा आणि यशस्वी व्हावा; असा कानमंत्र व्याख्याते प्रा.नंदकिशोर वलटे यांनी दिला.

युवक दिनानिमित्त करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात राष्ट्रीय सेनेच्या (एनसीसी) विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रा.वलटे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. त्यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना प्रा.वलटे यांनी आपल्या ओघवत्या शैलीमध्ये तरुणांना प्रभावीपणे मार्गदर्शन केले. तरूणांनी आपले आदर्श समजून घेतले पाहिजेत व आपल्या देशाचा इतिहास वाचला पाहिजे; ही अपेक्षा बोलून दाखवली. तसेच भारताची संस्कृती, इतिहास, आदर्श व्यक्ती याचे सप्रमाण दाखले दिले. राष्ट्रीय छात्रसेनेत दाखल झालेल्या मुलामुलींना सैन्यात दाखल होऊन देशसेवा करा; अशी अपेक्षा बोलून दाखवली. या कार्यक्रमासाठी सिनियर विभागाचे उपप्राचार्य डॉ.साळुंखे, ज्युनियर विभागप्रमुख कर्नल संभाजी किर्दाक व एन.सी.सी.कॅडेट उपस्थित होते.

व्याख्यानाच्या शेवटी हर घर तिरंगा या संकल्पनेचे अनावरण केले आणि मेरी मिट्टी मेरा देश या नवीन संकल्पनेची विद्यार्थ्यांना माहिती दिली. सुत्रसंचालन लेफ्टनंट गायकवाड मॅडम यांनी केले तर उपस्थितांचे आभार निलेश भुसारे यांनी मानले.

# करमाळा आगारात बसगाड्यांसह चालक, वाहकांची कमतरता

## जादा बसेस व चालक-वाहकासाठी महेश चिवटे यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

करमाळा(सं.प्र.) : सोलापूर, पुणे, अहमदनगर, उस्मानाबाद या चार जिल्ह्यांना जोडणाऱ्या करमाळा आगारास बसगाड्यांसह चालक आणि वाहकांची कमतरता आहे. तरी प्रवाशांच्या वाहतुकीची योग्य सोय होण्यासाठी करमाळा आगारास बसगाड्यांसह चालक, वाहक मिळावेत; अशी मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी केली आहे.

याबाबत चिवटे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले आहे. करमाळा आगारात दैनंदिन बसेस चालविण्यासाठी १३९ चालक व १३९ वाहकांची आवश्यकता आहे. परंतु सद्यस्थितीत या आगारात ८० चालक, वाहक ९६ कार्यरत आहेत. तरी या आगारास २४ चालक व २४ वाहक यांची आवश्यकता आहे. तसेच करमाळा आगारातील अनेक बसेसचे आयुर्मान दहा वर्षापेक्षा जास्त असल्यामुळे लांब पल्ला व मध्यम पल्ला वाहतुकीसाठी करमाळा आगारास २६ बसेसची कमतरता भासत आहे. तरी करमाळा आगारास नवीन बसेस मिळाव्यात व आणखी वाहक-चालक कर्मचारी यांची नियुक्ती करण्यासाठी योग्य ते आदेश पारित करून करमाळा तालुक्यातील नागरीकांचा प्रश्न सोडवावा; अशीही मागणी चिवटे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# वाशिंबे ग्रामपंचायतीच्या वतीने ग्रामस्थांना आरोचे शुध्द पाणी मोफत देण्याचा निर्णय

करमाळा(सं.प्र.) : स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून वाशिंबे ग्रामपंचायतीच्या वतीने ग्रामस्थांना आरोचे शुध्द पाणी मोफत देण्याचा निर्णय सरपंच तानाजी झोळ, उपसरपंच अमोल पवार व सर्व ग्रामपंचायत सदस्यांच्या उपस्थिती मध्ये घेण्यात आला. ग्रामस्थांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी सर्वांना मोफत शुध्द पाणी मिळावे.. या हेतूने वाशिंबे ग्रामपंचायतने हा निर्णय घेतला असून मोफत शुध्द पाणी देण्याचा बहुमान वाशिंबे ग्रामपंचायतीने मिळवला आहे. यामुळे करमाळा तालुक्यातील इतर ग्रामपंचायतीसमोर वाशिंबे ग्रामपंचायतीने एक आदर्श निर्माण केला आहे. या निर्णयामुळे ग्रामस्थांकडून वाशिंबे ग्रामपंचायतीचे कौतूक होत आहे. पुढील काळात आरोग्य, रस्ते, शिक्षण, वीज, पाणीपुरवठा अशा विविध समस्यांवर ग्रामपंचायतीकडून ठोस पावले उचलून नागरीकांच्या हिताचे निर्णय घेतले जातील; असेही सरपंच तानाजी झोळ यांनी सांगितले.

श्री गजानन अगरबत्ती
• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य
योग्य दरात मिळेल !

पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

ओजस हॉस्पिटल
OJS HOSPITAL
AlIOPATHY AYURVED HOMEOPATHY
डॉ.रोहन रामदास कुंभार B.A.M.S. M.D.(Acu) D.G.O. स्त्रीरोग तज्ञ
डॉ.मनोज रामदास कुंभार M.D. कन्सलटींग फिजीशीयन
डॉ.सौ.अंजली रोहन कुंभार B.H.M.S. होमिओपॅथिक कन्सलटंट
वेळ : सकाळी ८ ते रात्री ८ | २४ तास अत्यावश्यक सेवा
डॉ.सौ.सायली मनोज कुंभार Nutritionist & Dietitian आहारतज्ञ
ॲलोपॅथी, आयुर्वेद होमिओपॅथी शास्त्रांच्या संयुक्त चिकित्सा पध्दतीने खालील आजारांवर अचूक निदान व योग्य उपचार • हृदयरोग व उच्च रक्तदाब • मधुमेह • थायरॉईड • संधिवात • पोटाचे आजार • स्त्रियांचे आजार • श्वसनसंस्थेचे आजार • मणक्यांचे व हाडांचे विकार • मुतखडा • मुळव्याध • सौंदर्य समस्या • त्वचारोग व केशविकार • आहारविषयक मार्गदर्शन • सुवर्णप्राशन संस्कार (दर महिन्यातील पुष्य नक्षत्रास)
उपलब्ध सुविधा : ECG, Multipara Monitor, Nebulisation(वाफेची सुविधा)
Glucometer (रक्तातील साखर तपासणी), प्रकृतीपरिक्षण, नाडीपरिक्षण, सुवर्णबिंदू प्राशन(जन्मापासून ते १६ वर्षा पर्यंत)
PAP SMEAR LBC, HPV DNA PCR, VILI & VIA Screening Test
(गर्भाशय मुख कर्करोग पूर्व तपासणीसाठी पुणे येथील नामांकीत लॅब गोलविलकर मेट्रोपोलिसशी संलग्नित)
पत्ता : केकीज केक शॉपच्या वरच्या मजल्यावर, सुभाष चौक, मेनरोड, करमाळा.
• संपर्क : 9960334005, 9423333950

## दुय्यम निबंधक कार्यालयाच्या बांधकामासाठी

# १ कोटी ६९ लाख निधी मंजूर :आ.संजयमामा शिंदे



करमाळा(सं.प्र.) : करमाळा येथील दुय्यम निबंधक श्रेणी १ या कार्यालयाच्या बांधकामासाठी १ कोटी ६९ लाख १८ हजार ७०५ रुपये निधी मंजूर झाला आहे. सदर इमारतीच्या बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता मिळाल्याची माहिती आमदार संजयमामा शिंदे यांनी दिली. याबाबत अधिक माहिती देताना आ.शिंदे म्हणाले, की करमाळा येथील सर्वच प्रशासकीय कार्यालयांच्या इमारती मोडकळीस आलेल्या असून करमाळा येथे सर्व शासकीय कार्यालयांचे एकत्रिकरण करून त्याच्या प्रशासकीय संकुल बांधकामासाठी आपण तत्कालीन महाविकास आघाडी सरकारकडे २५ कोटी रूपये निधीची मागणी केलेली असून त्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. भविष्यकाळामध्ये प्रशासकीय संकुलाची इमारत उभी राहली. तत्पूर्वी सहाय्यक निबंधक कार्यालयाची इमारतही मोडकळीस आलेली होती. त्यासाठी आपण स्वतंत्रपणे निधीची मागणी केली होती. त्यानुसार सदर निधी मंजुरीची प्रशासकीय मान्यता मिळाली असल्यामुळे लवकरच सहाय्यक निबंधक कार्यालयाचे बांधकाम सुरु होईल.

आत्तापर्यंत आपण करमाळा शहरामध्ये उपजिल्हा रूग्णालयाच्या बांधकामासाठी २५ कोटी रू. तसेच उपजिल्हा रूग्णालयातील कर्मचारी वसाहतीसाठी १८ कोटी रूपयांचा निधी मंजूर केलेला असून त्याचे बांधकाम सध्या प्रगतीपथावर आहे.. करमाळा शहराच्या वैभवामध्ये भर घालणारी नगरपरिषदेची इमारत, सांस्कृतीक सभागृह व छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा यासाठी १० कोटी रूपये निधी मंजूर आहे, त्याची बांधकामेही लवकरच सुरू होती. आपल्या कार्यकाळात करमाळा शहरामध्ये एकूण ५५ कोटी निधी मंजूर झालेला आहे व त्या माध्यमातून बांधकामेही सुरू आहेत. तसेच कमलाभवानीच्या परिसर विकासासाठी चार कोटी रूपयांचा निधी मंजूर झालेला होत. त्यामधून विविध बांधकामे सुरु आहेत. एकूणच करमाळा शहर व परिसराचा चेहरामोहरा बदलण्याच्या दृष्टीने हा निधी महत्वाचा ठरणार आहे.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल डोळ्याचा दवाखाना
डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
उपलब्ध सुविधा..
• मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
• जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
• फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदूवरील शस्त्रक्रिया.
• सुसज्ज ऑपरेशन थिएटर
• जपानच्या अत्याधुनिक कॉम्प्युटरवर नेत्र तपासणी व चष्म्याचे नंबर काढण्याची सोय
• नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
• लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
पत्ता
पुणे रोड, त्रिमूर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा.
मो.9423222266, 9604762600
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स (आमच्याकडे शास्त्रोक्त पध्दतीने बनविलेले अचूक नंबरचे चष्मे अर्जंट बनवून मिळतील)
पत्ता : बसस्थानक शेजारी, बँक ऑफ इंडिया समोर, करमाळा.(9527268181 / 9860872619)

सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी २०० रू.

# धम्मसंगीत लॉन्स मंगल कार्यालयाचे १९ ऑगस्टला उद्घाटन

करमाळा(सं.प्र.) : येथील कर्जत रोडवर नव्याने निर्माण झालेल्या धर्मसंगीत लॉन्स मंगल कार्यालयाचा उद्घाटन सोहळा १९ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेपाच वाजता होणार आहे. या कार्यालयाचे उद्घाटन आमदार संजयमामा शिंदे यांचे हस्ते होणार आहे. यावेळी ह.भ.प.माऊली महाराज पठाडे यांचे किर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमास जास्तीत जास्त नागरीकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक आबासाहेब आवटे यांनी केले आहे.

करमाळा शहरापासून एक ते दीड किलोमीटर अंतरावर हे भव्य असे मंगल कार्यालय श्री.आवटे यांनी उभा केले असून, या ठिकाणी एक हजार खुर्च्या, शंभर टेबल तसेच सहा रुम वधू-वरासाठी, स्वयंपाक व जेवणाची भांड, ३५ केव्ही जनरेटर, साऊंड सिस्टीम तसेच वायफाय सुविधा, सर्व ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेराची निगराणी राहणार आहे. तसेच कार्यालयाच्या लॉन्स एन्ट्रीला भव्य असे रोमन थीम डेकोरेशन सेट संपूर्ण लाईटींगसह उभारलेला आहे. या ठिकाणी सर्व सुविधायुक्त प्रशस्त लॉन्स, लग्न हॉल, जेवण हॉल, किचन, प्रशस्त पार्कींग असे अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत. या



ठिकाणी पॅकेजची व्यवस्था देखील करण्यात आलेली आहे. करमाळा शहरापासून अत्यंत जवळ असलेले भव्य असे हे देखणे व लॉन्स मंगल कार्यालय आहे. याचा जास्तीत जास्त नागरीकांनी लाभ घेण्याचे आवाहन आवटे यांनी केले आहे. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून माजी विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ.शहाजी सोळुंके, आमदार रोहित पवार, माजी आमदार जयवंतराव जगताप, माजी आमदार नारायण पाटील, माजी आमदार शामलताई बागल, जिल्हा पोलीस प्रमुख डॉ.शिरीष सरदेशपांडे, उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त नवनाथ घोगरे, पोलीस निरीक्षक ज्योतिराम गुंजवटे, उद्योजक भरत लिमन आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. उद्घाटनानंतर माऊली महाराज पठाडे यांचे किर्तन होणार आहे. याचाही लाभ नागरीकांनी घेण्याचे आवाहन आवटे यांनी केले आहे.

# सुरताल संगीत विद्यालय तर्फे २० ऑगस्टला संगीत व नृत्यमहोत्सव

करमाळा(सं.प्र.) : कमलाभवानी बहुउद्देशीय संस्था संचलित सुरताल संगीत विद्यालयाच्या वतीने २० ऑगस्ट रोजी सायंकाळी पाच वाजता विकी मंगल कार्यालय येथे संगीत व नृत्यमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

दरवर्षीप्रमाणे पं.विष्णु दिगंबर पलुस्कर आणि पं.के.एन.बोळंगे गुरूजी यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून उत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबरच वेगवेगळ्या राज्यातील तसेच आंतरराष्ट्रीय ख्यातीचे गायक व नृत्य कलावंत उपस्थित राहणार आहेत. शास्त्रीय गायिका परमिता रॉय (कोलकता), मणिपुरी नृत्यांगणा नंदितो कुहेलीका (कोलकता), कत्थक नृत्यांगणा मौमिता चक्रवर्ती (सिलिगुडी), ओडिसा नृत्यांगना सुजाता नायक (कोलकता), सत्रिय नृत्यांगणा मंजुमनी बोराह (गुवाहाटी), कुचीपुडी नृत्यांगना तेजस्विनी कलगा (हैदराबाद), भरतनाट्यम नृत्यांगना सुदीपा सैन सिल (कोलकता), कथक नृत्यांगना डॉ.अर्पिता चॅटर्जी (कोलकता) इ. आंतरराष्ट्रीय किर्तीचे कलाकार आपली कला सादर करणार आहेत. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना तसेच कलाकारांना संस्थेच्या वतीने पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्याच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच करमाळा येथील रसिकांना वेगवेगळ्या प्रकारचे नृत्य पाहायला मिळणार आहेत. तरी रसिक श्रोत्यांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा; असे आवाहन सुरताल संगीत विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब नरारे यांनी केले आहे.

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर खुशखबर
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
आता आपल्या करमाळ्यात !
बार्शी
धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल
कोर्ट समोर, करमाळा-परांडा बस स्टॉप, बार्शी.
मो.९७६७८९९५७१
टीप..
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
उपलब्ध सुविधा...
- मुळव्याधवर इंजेक्शन
- डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब
- एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब
- संडासवाटे रक्त येणे, पु येणे
- संडासची जागा बाहेर पडणे
- संडास जागी खाज व आग होणे
- संडासाचा नागवेडा
- संडास नंतर बसण्यास त्रास होणे
- भगंदर, फिशर
- चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)
करमाळा
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
स्थळ : सावंत हॉस्पीटल मेनरोड, सावंत गल्ली, करमाळा.
संपर्क : मो.7057675589 7350632138
परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई

• नावनोंदणीसाठी संपर्क : मो.9405675887

## शिंदे हॉस्पिटलच्या वर्धापन दिनानिमित्त

# मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबीर संपन्न





करमाळा(सं.प्र.): शिंदे हॉस्पिटल शाहूनगर करमाळा च्या वर्धापन दिनानिमित्त १५ ऑगस्ट रोजी मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबीर संपन्न झाले. या शिबीराचे उद्घाटन एम.जी.एम. मेडिकल कॉलेज संभाजीनगर(औरंगाबाद) येथील सर्जन व पोटाचे विकार तज्ञ डॉ.प्रफुल्ल पवार यांचे हस्ते करण्यात आले. शिंदे हॉस्पिटलमध्ये मर्यादित कालावधी करीता बी.एम.डी. युरिक ॲसिड तपासणी मोफत करण्यात आल्या असून हाडांच्या ऑपरेशनमध्ये ४० टक्के सवलत देण्यात आली आहे. तसेच इंडोस्कोपी, अंगावरील लहान गाठ काढणे, हर्निया, हायड्रोसिल, मुळव्याध, अपेंडिक्स, भगेंद्र, मुतखडा इ. तपासण्या पोटाचे विकार तज्ञ डॉ.प्रफुल्ल पवार यांनी केल्या. डॉ.दयानंद शिंदे, डॉ.चेतना शिंदे, डॉ.प्रफुल्ल पवार यांच्या माध्यमातून शिबीरामध्ये एकूण ३९० मोफत तपासण्या करण्यात आल्या.

> यावेळी बोलताना डॉ.दयानंद शिंदे म्हणाले, की पेशंटच्या आजाराचे योग्य उपचार करून त्यांना रोगमुक्त करणे हे आमचे कर्तव्य आहे. त्याचबरोबर पेशंटच्या सोयीसाठी शिंदे हॉस्पिटलमध्ये मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता निधी (महाराष्ट्र शासन) उपलब्ध आहे.

१५ ऑगस्टला हॉस्पिटलच्या प्रांगणात ध्वजारोहण केले गेले. त्याचबरोबर हॉस्पिटलच्या वर्धापन दिनानिमित्त लोकांच्या हितासाठी मोफत सर्वरोग निदान शिबीर घेतले जातील; असे डॉ.दयानंद शिंदे यांनी सांगितले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी शिंदे हॉस्पिटल मधील सर्व नर्स स्टाफ, वार्डबॉय, ओ.टी. असिस्टंट, लॅब, मेडिकल या सर्व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

सनराईज इंग्लिश क्लासेस
Center of excellence in English
इयत्ता १ ली ते १० वी पर्यंत. (मराठी / सेमी / इंग्रजी / सी.बी.एस.ई. माध्यम)
क्लासची वैशिष्ट्ये
- प्रशस्त हॉल
- डिजिटल क्लास ची संकल्पना
- संपूर्ण क्लास CCTV कॅमेऱ्याच्या कक्षेत
- प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र आसन व्यवस्था
- मनोरंजनात्मक शिक्षण
- फक्त पुस्तकीज्ञानापेक्षा इतर प्रभावी ज्ञानावर भर
- नियमीत चाचणी परीक्षा
- विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व अभ्यासासाठी प्रेरणा
- विद्यार्थ्यांचा इंग्लिश विषयाचा परिपूर्ण आणि सर्वांगीण विकास
- ॲक्टिव्हिटी बेस शिक्षण
- व्यवहारीक व दैनंदिन उदाहरणातून स्पष्टीकरण
- अवघड असणाऱ्या इंग्रजी विषयाचे सोप्या पध्दतीत स्पष्टीकरण
- विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाची आवड निर्मिती
- क्लुप्त्या वापरुन व्याकरणाचे स्पष्टीकरण
- विद्यार्थ्यांचे समुपदेशन व प्रत्येक शनिवारी मास्टर क्लास
- इंग्रजीतुन संवाद व संभाषण यावर भर
- सभाधिटपणा येण्यासाठी विशेष तयारी
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार विद्यार्थ्यांची तयारी
स्पोकन इंग्लिशची स्पेशल बॅच - बेसिक, इंटरमेडिएट व ॲडव्हान्स कोर्सेस
मुजावर सर 9423732646
स्थळ :- ''आदित्य प्लाझा'',भवानी नाक्याजवळ, संताजी नगर, करमाळा जि.सोलापूर

डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना श्रीजय नेत्र रूग्णालय
डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A
करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.
वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध
श्रीजय ऑप्टिकल (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३


करमाळा तालुक्याचे पाणीदार माजी आमदार
मा.श्री.नारायण(आबा) पाटील
आपणांस २३ ऑगस्ट रोजी असलेल्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा
अध्यक्ष
उपाध्यक्ष
सचिव
खजिनदार
मार्गदर्शक
अमोल महामुनी
सुनील महामुनी
गणेश भास्कर पंडित
उत्तमशेठ वेदपाठक
वीरचंद गादीया
प्रविण माळवे
रविंद्र माळवे
विलास महामुनी
तात्यासाो मंजरतकर
शितलशेठ शहाणे
चेतनशेठ सोळंकी
राहूल राठोड सर
बाबूशेठ महामुनी
अरूण महामुनी
सुहासशेठ महामुनी
संजय महामुनी
आण्णासाहेब क्षीरसागर
सदानंद महामुनी
अतुल महामुनी
संतोष वेदपाठक
सागर क्षीरसागर
शुभम महामुनी
जेऊर सराफ व सुवर्णकार असो;
ता.करमाळा., जि.सोलापूर


मा.सभापती, पं.स.
युवक नेते
युवा नेते
चेअरमन
व्हा.चेअरमन
सचिव
श्री.धुळाभाऊ कोकरे
श्री.दत्तात्रय रणसिंग
प्रा.विलास ठोकळ सर
कर्तव्यदक्ष माजी आमदार
मा.नारायण(आबा) पाटील
आपणांस.. वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...
23 August
लोकनेते नारायण(आबा) पाटील ग्रा.बि.सहकारी पतसंस्था मर्या; जेऊर
संचालक : विलास दिगंबर पाटील, सुलेमान अब्बास मुल्ला, विष्णु भानुदास गुटाळ, शिवाजी सिद्राम गावडे, परेशकुमार प्रविणकुमार दोशी
डॉ.अतुल कांतीलाल लुणावत, चंद्रकांत अर्जुन बोराडे
सौ.वंदना नातू शिंगाडे, रूक्मीणी किसन माने
व्यवस्थापक - शेख महंमद सलीम उमर (सर्व सभासद, कर्मचारी व पिग्मी एजंट)
शुभेच्छुक
आकर्षक व्याजदर...
सेव्हींग खाते - ४%,
मुदत ठेव - १ वर्षे ८%, २ वर्षे ८.५०%, ३ वर्षे ९%
विनम्र तत्पर सेवा, तात्काळ कर्जसुविधा

# दिलमेश्वर जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



करमाळा(सं.प्र.) : खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष तथा जगताप गटाचे युवा नेते शंभुराजे जगताप यांनी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून दिलमेश्वर जिल्हापरिषद प्राथमिक शाळेत जाऊन गरजू विद्यार्थ्यांना वही, पेन, पेन्सील या शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. तसेच उपस्थित मान्यवरांना, ग्रामस्थांना व विद्यार्थ्यांना भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी शंभुराजे जगताप म्हणाले, की तालुक्याच्या शेवटच्या टोकाचे जिल्हा सरहद्दीवरच्या गावातील गरीब, होतकरू विद्यार्थ्यांनी शिक्षण घेवून यशस्वी व्हावे व भविष्यात गावाचे नाव करावे. खरे रत्न हे ग्रामीण भागात असतात. त्यांना पैलू पाडण्याचे काम गुरूजनांचे असून पालकांनी आपल्या पाल्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. आज गरजू विद्यार्थ्यांना शालेपयोगी साहित्य वाटताना आनंद वाटतो आहे. ग्रामीण भाग असो वा दूर्गम भाग असो. सर्वांना शिक्षण घेण्याचा हक्क आहे. परंतू आर्थिक परिस्थिती नाजूक असेलतर कित्येक प्रज्ञावंत विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात. त्यामुळे एक मदतीचा हात म्हणून आपण शालेय साहित्य वाटप करत आहोत. यावेळी कोकाटे सर, कोल्हे मॅडम, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शिवाजी मल्लाव, रमेश बिरंगळ, माजी सरपंच विलास मारकड, ग्रामपंचायत सदस्य युनूस पठाण, दत्तू मस्के, शिवाजी राक्षे, जीवन पिसाळ, माऊली मोरे, संजय भोज, विशाल पाटील, अक्षय घाडगे, ग्रामस्थ उपस्थित होते.

# करमाळा ते श्रीदेवीचामाळ रस्त्यावर गतिरोधक बसविण्याची मागणी

करमाळा (सं.प्र.) : करमाळा ते श्रीदेवीचामाळ हा रस्ता उत्तम दर्जाचा झाला असून या रस्त्यावर वाहन चालक अतिवेगाने वाहने चालवत आहेत. यामुळे या रस्त्यावर वारंवार अपघात होत आहेत. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्यावर गतिरोधक उभारावेत; अशी नागरीकांची मागणी आहे. करमाळा ते श्रीदेवीचामाळ हा रस्ता रूंद व उत्तम दर्जाचा झाला आहे. या रस्त्याच्या दोन्ही बाजुला वेगवेगळे व्यावसायिक बसलेले असतात. तसेच एका बाजुला कृष्णाजीनगर व दुसऱ्या बाजुला शाहुनगर अशी उपनगरे आहेत. या भागातील नागरीक विशेषत: लहान मुले, महिला व वृध्द पुरुष सातत्याने वेगवेगळ्या कारणाने रस्त्यावर येतात. त्यावेळी अनेक तरूण आपल्या ताब्यातील वाहने बेफाम चालवतात. त्यातून अनेकदा अपघातही झाले आहेत. बहुतांशी लोक कमलादेवीच्या दर्शनासाठी जात असताना त्यांना अपघाताला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे तातडीने गतिरोधक उभारावेत; अशी नागरीकांची मागणी आहे.

डॉ.राऊत Advanced dental Clinic & Root Canal Center
दातांचा दवाखाना
Smile with confidence
उपलब्ध सुविधा...
● इंटराओरल कॅमेराद्वारे तपासणी
● डिजीटल एक्स-रे
● अत्याधुनिक यंत्रणेद्वारे रूट कॅनल ट्रिटमेंट
● वेदनारहित दात व दाढ काढणे
● पडलेले दात बसविणे
● दात साफ करणे
● दाताच्या रंगाचे सिमेंट भरणे/चांदी भरणे
उपलब्ध सुविधा...
● स्क्रुच्या सहाय्याने दात बसविणे (डेंटल इम्प्लांट)
● अक्कलदाढ काढणे
● वेडेवाकडे पुढे आलेले दात सरळ करणे
● अंशत: किंवा पूर्ण कवळी बसवणे
● हिरड्यांच्या रोगासाठी ट्रिटमेंट
● कॉस्मेटिक ट्रिटमेंट
● कर्करोगाचे निदान
● गरजेनुसार तज्ञ डॉक्टरांच्या भेटी
डॉ.कौस्तुभ काशिनाथ राऊत
बी.डी.एस. (डेन्टल सर्जन)
महात्मा गांधी शाळेच्या पाठीमागे, पुणे रोड, करमाळा. (मो.9552134186)

# सावडी गावच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहणार : गणेश चिवटे



करमाळा(सं.प्र.) : सावडी गावच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सदैव प्रयत्नशील राहणार; असे आश्वासन भाजपाचे तालुका अध्यक्ष तथा सोलापूर जिल्हा नियोजन समिती सदस्य गणेश चिवटे यांनी दिले.

सावडी येथील दोन रस्त्याच्या कामांचे उद्घाटन श्री.चिवटे यांचे हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना श्री.चिवटे म्हणाले, की सावडीचे उपसरपंच महेंद्र एकाड यांनी स्वखर्चातून सावडी ते भराटेवस्ती व भोसले वस्ती ते ननवरे वस्ती या दोन रस्त्यावर मुरूमीकरण केले. या कामाचा शुभारंभ माझ्या हस्ते होत आहे हे मी माझे भाग्य समजतो. श्री.एकाड यांनी स्वखर्चातून केलेले काम उल्लेखनीय व प्रशंसनीय आहे. समाजाचं आपण काहीतरी देणं लागतो.. या उदात्त भुमिकेतून त्यांनी सदरच्या रस्त्यासाठी खर्च केला आहे. समाजाला आज एकाड सारख्या नेतृत्वाची गरज आहे. केंद्रात व राज्यात आता भाजपा सरकार आहे. कोणत्याही शासकीय-प्रशासकीय अडीअडचणीसाठी मी आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. समाजातील प्रत्येक वंचित शोषित घटकासाठी सरकार अनेक योजना तयार करत आहे. त्याचा लाभ लोकांनी घेतला पाहिजे. कोणत्याही योजनेचा लाभ घेण्यासाठी काही अडचण येत असल्यास लोकांनी भाजपा कार्यकर्ते किंवा थेट माझ्याशी संपर्क करावा. ज्येष्ठ नागरीकांसाठी संजय गांधी निराधार योजना, शेतकऱ्यांसाठी सेस फंडातून ५० टक्के अनुदानवर औजारे, बांधकाम कामगारांसाठी अनेक योजना आहेत. त्याचा लाभ गरजूंनी घ्यावा; असेही आवाहन चिवटे यांनी केले.

यावेळी भाजपाचे तालुका उपाध्यक्ष रामभाऊ ढाणे, अमोल पवार, सोमनाथ घाडगे, आदिनाथ सुरवसे, दासाबापू बरडे, भैय्या गोसावी, पै.अफसर जाधव, संजय किरवे, सागर भराटे, हनुमंत एकाड, विक्रम एकाड, श्रीराम मचाले, शरद एकाड यासह बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

महाराष्ट्रात प्रथमच...
गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामुक्त व्हा...
आता जुन्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !
२ चाकी | ३ चाकी | ४ चाकी | ट्रक | ट्रॅक्टर | JCB | पोकलेन | सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

गोडाऊन विकणे अथवा भाड्याने देणे आहे
करमाळा येथील मौलालीमाळ वरील
श्री कमलादेवी औद्योगिक वसाहत मधील ६००० स्क्वे.फुट असलेले
गोडाऊन विकणे अथवा भाड्याने देणे आहे.
टीप : टॉयलेट, बाथरूम, २४ तास वीज व पाणी, वॉचमन रूम, मॅनेजर केबीन
रेस्ट रूम, दोन्ही बाजूंनी रस्ता, हायवेपासून ५० मीटर अंतरावर, स्वतंत्र रस्ता इ. सुविधा.
संपर्क : मो.नं.9422409196

बंगला भाड्याने देणे आहे
गणेशनगर मधील सर्व सोयीनेयुक्त 2BHK बंगला भाड्याने देणे आहे तसेच मंगळवार पेठेतील दोन हॉल क्लासेस किंवा ऑफिससाठी भाड्याने देणे आहे.
संपर्क : मो.नं.9423069349


लोकनेते
सभापती, पं.स.
23 ऑगस्ट
करमाळा तालुक्याचे पाणीदार माजी आमदार
श्री.नारायण(आबा) पाटील यांना
वाढदिवसानिमित्त..
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
मे.आरोही इलेक्ट्रीकल अॅन्ड कॉन्ट्रॅक्टर
जेऊर(वांगी नं.३), ता.करमाळा. मो.८९७५८९११८८
प्रोप्रा : पै.सचिन लोंढे (गव्हर्नमेंट इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर)
टीप : आमचेकडे MSEB ची सर्व कामे केली जातील.
पै.सचिन लोंढे


23 August
करमाळा तालुक्याचे माजी आमदार
मा.नारायण(आबा) पाटील
आपणांस..
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...
शुभेच्छुक
कर्मयोगी गोविंदबापू पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या; जेऊर
चेअरमन : संजय गादीया (चेअरमन), व्हा.चेअरमन : मुबारक शेख, सचिव : अनिल पाटील (सचिव)
संचालक : सुनील शहाणे,शितल दोशी, नवनीतशेठ दोशी, अर्जुन पांढरे, श्रीकृष्ण कांबळे, छाया गुटाळ, अर्चना लुणावत
व्यवस्थापक : शांताराम सुतार, क्लार्क : सोमनाथ वाघमोडे, शिपाई : कुंडलिक जाधव(शिपाई) सर्व सभासद व कर्मचारी वृंद

# श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान मध्ये सूर्यनमस्कार यज्ञ-२ संपन्न



करमाळा(सं.प्र.): करमाळा अर्बन बँकेचे चेअरमन कन्हैयालाल देवी यांच्या वाढदिवसानिमित्त श्री गिरधरदासजी देवी प्रतिष्ठान संचलित नवभारत इंग्लीश मेडियम स्कुल, ट्विंकलींग स्टार्स आणि गिरधरदास देवी विद्यालयामध्ये साखळी सुर्यनमस्कार यज्ञ-२ कार्यक्रम संपन्न झाला. युवा मित्र अनुज देवी यांच्या संकल्पेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शुक्रवारी १८ ऑगस्टला प्रशालेमध्ये सूर्योदयापासून (६ वा. १३ मि.) सूर्यास्ता पर्यंत (६ वा. ५५ मि.) साखळी सूर्यनमस्कार करण्यात आले. कन्हैयालाल देवी व सुनिता देवी यांचे हस्ते प्रतिमा पूजन करून या उपक्रमाची सुरूवात करण्यात आली. कार्यक्रम प्रसंगी संचालक अमोद संचेती, चंद्रकांत देवी, विजयकुमार दोशी आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात दोन्ही शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सूर्यनमस्कार केले. प्रशालेच्या मुख्याध्यापिका मोहिते मॅडम, मुख्याध्यापक जगताप सर उपस्थित होते. सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांनीही सूर्यनमस्कार करून या यज्ञामध्ये आपला सहभाग नोंदवला. गेल्या वर्षीप्रमाणे यावर्षीही या उपक्रमाला सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांकडून उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.

## मध्यरात्री पर्यंत जीव धोक्यात घालून
# वीज कर्मचाऱ्यांनी केला वीजपुरवठा सुरू



करमाळा(सं.प्र.) : मंगळवारी खंडीत झालेला वीजपुरवठा दुरूस्त करण्यात आल्यानंतर रात्री दहा वाजता नेमका घोटाळा कुठे आहे, हे लक्षात आलं. यावेळी वीज कर्मचाऱ्यांनी आपला जीव धोक्यात घालून अंधाऱ्या रात्रीत अंडरग्राऊंड लाईटच्या केबलचे काम करून करमाळा शहर व ३५ गावचा वीजपुरवठा तात्काळ सुरू केला. मुख्य प्रशासकीय अधिकारी गैरहजर असताना सुध्दा वायरमन लोकांनी केलेल्या कामामुळे वायरमन लोकांचे कौतूक होत आहे.

करमाळा सहाय्यक वीज अभियंता दीर्घकालीन रजेवर असून त्यांचा चार्जेस जेऊर येथील वीज अभियंत्याकडे आहे. तसेच जेऊर येथील अभियंता सुध्दा रजेवर गेले आहेत. असे असताना अचानक करमाळा शहराचे उपस्थित गावाचा विद्युत पुरवठा बंद झाला होता. मांगी सबस्टेशन ते करमाळा सबस्टेशन सर्व विद्युत लाईन वायरमन लोकांनी चेक केली मात्र घोटाळा निष्पन्न झाला नाही. आवटी रस्त्याचे काम सध्या चालू असून या रस्त्याचे ठेकेदाराने श्रीदेवीचामाळ च्या पायथ्याशी खोदलेल्या रस्त्यात अंडरग्राऊंड गेलेली वीज महामंडळाची केबल तुटलेली होती. अद्ययावत यंत्रणा उपलब्ध नसल्यामुळे घोटाळा निष्पन्न होऊ शकला नाही. सदरचा घोटाळा उघडकीस आला तेव्हा रात्रीचे आठ वाजले होते. त्यानंतर वायरमन शिंदे, वाघमारे व त्यांचे कर्मचारी व ठेकेदार घरबुडवे, पुराणिक, ढेरे यांनी मिळून विद्युत पुरवठा सुरू केला.




# दहिगाव सिंचन योजनेचे आवर्तन सुरू करावे - आ.संजयमामा शिंदे



करमाळा (सं.प्र.) : करमाळा तालुक्यासह एकूणच राज्यामध्ये सध्या दुष्काळ सदृश्य परिस्थिती आहे. ही बाब लक्षात घेऊन दहिगाव उपसासिंचन योजनेचे खरीप आवर्तन सुरू करावे; अशी आग्रही मागणी आमदार संजयमामा शिंदे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेकडे केली आहे.

यावर्षी उजनी धरण मे महिन्याच्या प्रारंभीच उणे पातळीमध्ये गेल्यामुळे दहिगाव उपसासिंचन योजना ६ मे च्या आसपास बंद पडली होती. पावसाळ्यामध्ये तीन महिने उलटून गेले तरी अद्यापही दमदार पावसाने हजेरी लावली नसल्यामुळे दहिगाव उपसासिंचन योजनेच्या पट्ट्यातील हंगामी पिकांबरोबरच केळी, ऊस सारख्या बारमाही पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. उजनी धरण अद्याप ३३ टक्के भरलेले नसलेतरीही दुष्काळी परिस्थितीचा विचार करता विशेष बाब म्हणून दहिगाव उपसासिंचन योजनेचे आवर्तन सुरू करावे; अशी मागणी आ.शिंदे यांनी केली आहे.

# सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेचा लाभ घ्यावा - संजय वाकडे

करमाळा(सं.प्र.) : शेतमाल बाजरात विकण्यापेक्षा प्रक्रिया करून त्याची विक्री केल्यास जादा फायदा होत असल्याने शेतकऱ्यांना भरघोस अनुदान मिळणाऱ्या प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेचा लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी घ्यावा; असे आवाहन तालुका कृषी अधिकारी संजय वाकडे यांनी केले.

शेटफळ येथे कृषी प्रक्रिया जागृती पंधरवड्या निमित्त आयोजित कार्यक्रमात श्री.वाकडे बोलत होते. यावेळी कृषी सहाय्यक सुप्रिया शेलार यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांना दिली. समन्वयक मनोज बोबडे यांनी कोणकोणते व्यवसाय या अंतर्गत केले जावू शकतात व त्यासाठी कर्ज अनुदान व लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती दिली. यावेळी यशस्वी कृषी प्रक्रिया उद्योग करणाऱ्या महिला उद्योजक मंदाकिनी चव्हाण, मनिषा बोराडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास कृषी पर्यवेक्षक मधुकर मारकड, कृषी लोकविकास फार्मर प्रोड्युसर कंपनीचे अध्यक्ष वैभव पोळ, संचालक नानासाहेब साळुंके, विलास लबडे, कैलास लबडे, अशोक लबडे, समाधान गुंड, रणजित लबडे, शिवाजी वाघमारे, सुहास पोळ, रोहित लबडे, विजय लबडे, महावीर निंबाळकर, सुंदरदास पोळ, प्रमोद पोळ व शेतकरी बांधव उपस्थित होते.

## स्व.सुभाष(आण्णा) सावंत यांच्या पुण्यतिथीनिमित्त
# रक्तदान व आरोग्य शिबीर संपन्न - रक्तदान शिबीरात २०९ व आरोग्य शिबीरात २७२ जणांचा सहभाग





करमाळा(सं.प्र.) : कामगार नेते, हमाल पंचायतचे संस्थापक अध्यक्ष स्व.सुभाष(आण्णा) सावंत यांच्या नवव्या पुण्यतिथीनिमित्त हमाल भवन येथे प्रतिमेचे पूजन करून रक्तदान शिबीर व आरोग्य शिबीर घेण्यात आले.

या शिबीराचे उद्घाटन वैद्यकिय अधिक्षक डॉ.गजानन गुंजकर, डॉ.वसंतराव पुंडे, डॉ.हरिदास केवारे, डॉ.रोहन पाटील यांचे हस्ते झाले. याप्रसंगी गोपाळ सावंत, विठ्ठल सावंत, माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब सावंत, डॉ.निलेश मोटे, डॉ.बाबूराव लावंड, डॉ.अनुप खोसे, डॉ.हर्षद माळवदकर, डॉ.विशाल केवारे, डॉ.दिपक केवारे, डॉ.संकेत सावंत आदी मान्यवर उपस्थित होते. शिबीराचे आयोजन हमाल पंचायत व छत्रपती शिवाजी तरूण मंडळ सावंतगल्ली यांचे वतीने करण्यात आले. या शिबीरात शुगर, बीपी, ईसीजी तपासणी करण्यात आले. या शिबीरात २७२ रूग्णांनी तपासणी करून गरजूंना मोफत औषधोपचार देण्यात आले. तसेच रक्तदान शिबीरात २०९ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्त संकलन श्री कमलाभवानी ब्लड सेंटर यांनी केले. यावेळी सहभागी रक्तदात्यांना जारचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हमाल पंचायतचे अध्यक्ष ॲड.राहुल सावंत यांनी केले.

यावेळी बोलताना आदिनाथचे माजी संचालक डॉ.पुंडे म्हणाले, की स्व.सुभाष आण्णांचे सामाजिक कार्य हे दिशादर्शक होते. त्यांच्या कार्याचा वसा व वारसा सावंत कुटूंब सक्षमपणे पुढे नेण्याचे काम करीत आहेत. राजकारणापेक्षा समाजकार्याला प्राधान्य देण्याचे काम स्व.सुभाष आण्णा यांनी केले. रक्तदान व आरोग्य शिबीर राबवून समाजाची एकप्रकारे सेवा केली आहे.

स्व.सुभाष आण्णा यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन करण्यासाठी बाजार समितीचे सभापती प्रा.शिवाजी बंडगर, शहाजी देशमुख, चेअरमन प्रभाकर शिंदे, सरपंच देविदास वाघ, माजी सरपंच नामदेव शेगडे, सरपंच भोजराज सुरवसे, माजी उपसभापती दत्तात्रय अडसुळ, सरपंच लहू काळे, सरपंच केशव शेळके, ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष डॉ.ॲड.बाबूराव हिरडे, ॲड.बलवंत राऊत, ॲड.प्रमोद जाधव, ॲड.सुहास मोरे, माजी सरपंच भगवान भोई, अजित पाटील, सुग्रीव नलवडे, गौतम ढाणे, विठ्ठल शिंदे, महादेव वायकुळे, नगरसेवक अल्ताफशेठ तांबोळी, राजू आव्हाड, उत्कर्ष गांधी, चेअरमन मनोज गोडसे, अशोक शहा, गोरख ढेरे, माजी सभापती किसन शिंदे, विजय पवार, पप्पू शिंदे, श्रीहरी भोगल, गोकुळ मुरूमकर, शिवाजी मुरूमकर, संतोष वाघमोडे, पाराजी शिंदे, आण्णा झिंजाडे, जयद्रथ शिंदे, भागवत वाघमोहे, सतीश मोटे, रावसाहेब शिंदे, आबासाहेब वारे, विठ्ठल नलवडे, पै.बाळू कोळेकर, धनंजय शिंदे, उपसरपंच रणजित बेरगळ, वैभव मुरूमकर, सुनील फुलारी, चंद्रकांत काळे, गणेश अंधारे, बालाजी अंधारे, बापू खरात, बाळासाहेब काळे, बाळासाहेब गपाट, बाळनाथ रोडे, गौतम रोडे, मनोज राखुंडे, शुभम कदम, ॲड.नवनाथ राखुंडे, प्रकाश झिंजाडे, मदनकाका देवी, राजेंद्र घाडगे, विश्वास बागल, ॲड.प्रशांत बागल, ॲड.बालाजी इंगळे, राजेंद्र काळे, वैभव दळवी, झुंबर कावळे, पै.दादा इंदलकर, आझाद शेख व पत्रकार उपस्थित होते. शिबीर यशस्वी करण्यासाठी नगरसेवक संजय सावंत, सुनील सावंत, वालचंद रोडगे, धनंजय सावंत, विठ्ठल रासकर, गजानन गावडे, रणजित सावंत, ज्ञानदेव गोसावी, फारूक जमादार, वैभव सावंत, दिपक सुपेकर, भिमराव लोंढे, सुनील शेळके, शिवाजी आवटे, महादेव कांबळे, राजू कांबळे, सतीश खंडागळे, सुभाष शेंडगे, राजकुमार सुरवसे, शरद वाडेकर, आकाश कुरकुटे, सागर सामसे, बापू उबाळे, विशाल रासकर, विशाल पवार, शिवराज गाढवे, अल्ताफ दारूवाले यांनी परिश्रम घेतले.

## जलजीवन मिशन योजने अंतर्गत
# सरपडोह येथे पाणीपुरवठा योजनेचे भूमीपुजन




करमाळा(सं.प्र.) : सरपडोह येथे जलजीवन मिशन योजने अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे भुमीपूजन आमदार संजयमामा शिंदे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य उध्दव माळी, अतुल मस्कर, सरपंच मालनताई वाळके, जिल्हा दूध उत्पादक संघाच्या संचालिका अलका चौगुले, माजी सरपंच कांतीलाल भिताडे, मनोहर रंधवे, नामदेव रंधवे, संजय भिताडे, रामदास पवार, बाळू गवारे, भानुदास शिंदे, रामचंद्र बोंद्रे, भैरवनाथ मोरे, नागनाथ भिताडे, पांडुरंग वाळके, विष्णू खरात, भारत भिताडे, रामदास नलवडे, मदन पाटील, किसन खरात, कुमार काळे व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी आमदार शिंदे यांनी सरपडोह गावच्या विकासासाठी आपण कटीबध्द राहू ; असे आश्वासन दिले.

# डॉ.महेश झोळ यांची राज्यकर अधिकारी पदी बढती

करमाळा(सं.प्र.) : वाशिंबे येथील डॉ.महेश ज्ञानदेव झोळ यांची राज्यकर अधिकारी पदी मुंबई येथे बढती झाली आहे. राज्यातील राज्य विक्रीकर अधिकाऱ्यांना बढती मिळाली असून विक्रीकर विभागाने बढतीचे आदेश काढले आहेत. यापूर्वी डॉ.झोळ हे विक्रीकर निरीक्षक या पदावर पुणे येथे कार्यरत होते. डॉ.महेश झोळ हे २०१३ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले होते. त्यांनी यापूर्वी सोलापूर येथे विक्रीकर निरीक्षक म्हणून काम केले आहे.

# ढेकळेवाडी शाळेत वृक्षलागवड

करमाळा(सं.प्र.) : जि.प.प्राथमिक शाळा ढेकळेवाडी (पोथरे) येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त विविध सामाजिक व वृक्षलागवडीचे उपक्रम राबविण्यात आले. सुरूवातीला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भाऊराव जाधव यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रेणिकशेठ खाटेर यांना संगीत रसिक पुरस्कार जाहीर



करमाळा(सं.प्र.) : येथील सुरताल संगीत विद्यालयाच्या वतीने दिला जाणारा सन्मानाचा सुरताल संगीत रसिक हा पुरस्कार येथील सामाजिक कार्यकर्ते व तपश्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रेणिकशेठ खाटेर यांना जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे वितरण २० ऑगस्टला रविवारी सायंकाळी पाच वाजता विकी मंगल कार्यालयात केले जाणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न्यायाधीश शरद देशपांडे हे राहणार आहेत तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, यशकल्याणी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी जास्तीत जास्त नागरीकांनी उपस्थित रहावे; असे आवाहन प्राचार्य बाळासाहेब नरारे यांनी केले आहे.

## जाहीर नोटीसीस उत्तर

तमाम लोकांना विशेषत: मौजे लव्हे, ता.करमाळा येथील लोकांना या उत्तराने कळविणेत येते की.. मौजे लव्हे, ता.करमाळा येथील शेतजमीन गट नं.८६ पैकी क्षेत्र - ०८ हे. ०९ आर मिळकत आमचे अशिल श्री.कमलाकर तुकाराम खरजे यांचे कुटूंबाचे खरेदी मालकी वहिवाटीची होती व आहे. सदरील मिळकत आमचे अशिलाची आई सुशिला तुकाराम खरजे यांनी सुरेश शंकर वळेकर यांचेकडून दि.१९/५/१९८४ रोजी रितसर नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी केलेली आहे. त्यानंतर आमचे अशिलाची आई सुशिला यांनी सदरील क्षेत्र - ०८ हे. ०९ आर या क्षेत्राचे आमचे अशिल, आमचे अशिलाची आई सुशिला व वडील तुकाराम खरजे यांचेमध्ये आपसात वाटप करून घेतलेले आहे. तथापि दरम्यान आमचे अशिलाची आई सुशिला व वडील तुकाराम दोघेही मयत असून सदर मिळकत आमचे अशिल एकवट्न वहिवाटून उपभोग घेत आहे. सदरील मिळकतीशी आमचे अशिलाशिवाय अन्य कोणाचाही संबंध नाही. तथापि आमचे अशिलाचे वर नमूद मिळकतीबाबत अनिल नामदेव पाटील रा.लव्हे यांना गैरअभिलाषा निर्माण झालेली असून त्यामुळे सदर अनिल नामदेव पाटील यांनी दि.३/८/२०२३ रोजीचे 'दैनिक संदेश' या वर्तमानपत्रामध्ये जाहीर नोटीस प्रसिध्द करून आमचे अशिलाचे मालकीचे वर नमूद क्षेत्राबाबत चुकीचा मजकूर व नोटीस प्रसिध्द केलेली आहे. वस्तुत: वर नमूद मिळकतीशी अनिल नामदेव पाटील यांचा किंवा अन्य कोणाचाही हक्क हितसंबंध नव्हता व नाही. त्यामुळे आमचे अशिल वर नमूद मिळकतीचा त्याचे इच्छेनुसार उपभोग घेणेस किंवा हस्तांतरण करणेस मुक्त आहे. हे उत्तर दिले.

ता.११/८/२०२३

**अशिला तर्फे ॲडव्होकेट**
**ॲड.विश्वजीत विकास बागल**
**करमाळा, मो.९१३०९३२४७६**


पाणीदार माजी आमदार
करमाळा तालुक्याचे लोकप्रिय
माजी आमदार
मा.नारायण(आबा)
गोविंदराव पाटील
23 August
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
ग्रामपंचायत जेऊर ता.करमाळा
• सौ.संगीता भारत साळवे(सरपंच)
• अंगद गोडसे (उपसरपंच)
• सर्व सदस्य (आजी/माजी) व ग्रामस्थ जेऊर

# साडे गावच्या विकासासाठी कटीबध्द : नारायण पाटील



करमाळा(सं.प्र.) : साडे ग्रामपंचायतीच्या विकासात्मक कामास आपले नेहमी सहकार्य राहील; असे आश्वासन माजी आमदार नारायण पाटील यांनी केले.

जेऊर येथील ग्रामपंचायत कार्यालयात साडे ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी आण्णासाहेब आडेकर यांची निवड झाल्या–बद्दल आयोजित सत्कार समारंभात श्री.पाटील बोलत होते. यावेळी उपसरपंच मंगलताई पाटील, ग्रा.पं.सदस्य अजिंक्य पाटील, श्रीपती काशीद, सोनाली खराडे, ज्ञानेश्वर तुपे, योगेश लोंढे, सचिन रोकडे, अक्षय पाटील, नागेश लाळगे यांचेही सत्कार करण्यात आले. याप्रसंगी भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रा.अर्जुन सरक, युवा नेते पृथ्वीराज पाटील, ग्रा.पं.सदस्य संदीप कोठारी, संतोष वाघमोडे, माजी उपसरपंच राजाभाऊ जगताप आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना श्री.पाटील म्हणाले, की करमाळा तालुक्यातील पूर्व भागात सिंचन क्षेत्र वाढवण्यात आपल्याला यश आले आहे. यापुढे साडे गावासह पूर्व भागातील सर्व ग्रामपंचायतींना शासनाकडून निधी मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करत राहणार. या भागातील नागरीकांना चांगल्या ग्रामसुविधा, भौतिक सुविधा तसेच आरोग्य, ग्रामस्वच्छता, गावांतर्गत रस्ते, वाडीवस्ती वरील रस्ते, पिण्याचे पाणी आदी मिळण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे विशेष निधीची मागणी करून मंजुरीसाठी पाठपुरावा सुरू ठेवणार आहे. उपस्थितांचे आभार स्वीय सहाय्यक सुर्यकांत पाटील यांनी मानले.

## जलजीवन योजनेच्या कामात

# अनियमितता असल्यास कडक कारवाई करणार : मनिषा आव्हाळे



करमाळा(सं.प्र.) : जलजीवन योजनेच्या माध्यमातून घराघरात स्वच्छ व चांगले पाणी पुरवावे हा केंद्र शासनाचा हेतू आहे. यासाठी कोट्यावधी रूपयांचा निधी सोलापूर जिल्ह्यासाठी उपलब्ध झाला आहे. याची कामे प्रचंड वेगाने जिल्ह्यात सुरू असून ही कामे पारदर्शकपणे व्हावीत; अशी प्रशासनाची इच्छा आहे. मात्र या कामात अनियमितता किंवा भ्रष्टाचार आढळल्यास कडक कारवाई करून वेळप्रसंगी गुन्हे दाखल करू; असा इशारा जिल्हा परिषदेच्या नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी दिला आहे.

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे व युवा सेना जिल्हाप्रमुख प्रियदर्शन साठे यांनी मनिषा आव्हाळे यांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत करून शुभेच्छा दिल्या. त्यावेळी त्या बोलत होत्या. पुढे बोलताना आव्हाळे म्हणाल्या, की आगामी काळात जिल्हा परिषदेच्या कारभारात सर्व कामे नियमानुसार होतील. कोणत्याही कामात दिरंगाई होणार नाही; असा विश्वास व्यक्त केला. जलजीवनच्या कामात ठेकेदार व संबंधित ग्रामपंचायत मधील काही पुढारी संगणमताने भ्रष्टाचार करत असल्याच्या अनेक तक्रारी पंचायत समिती कार्यालयात येत आहेत. मात्र या तक्रारी आर्थिक तडजोड करून मिटवण्याचे प्रकार वाढले असल्याची चर्चा आहे. करमाळा तालुक्यातील वांगी, झरे सह बारा ठिकाणच्या जलजीवनच्या कामात भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी आहेत. या निकृष्ट कामामुळे केंद्र सरकारचा घराघरात पाणी देण्याचा उपक्रम अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जलजीवनच्या कामात भ्रष्टाचार होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याची लिखित तक्रार करावी व त्याची एक प्रत शिवसेना कार्यालयात द्यावी. अशा प्रकरणाचा शिवसेना नक्की पाठपुरावा करेल व चांगल्या दर्जाच्या जलजीवन योजना तयार होतील यासाठी प्रयत्न करू;असे शिवसेनेच्या वतीने सांगण्यात आले.

# तालुकास्तरीय योगासन स्पर्धेत महात्मा गांधी विद्यालयाचे यश

करमाळा(सं.प्र.) : जिल्हा क्रिडा अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय योगासन स्पर्धेत महात्मा गांधी विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या स्पर्धेत १४ वर्षे वयोगटात रणवीर चेंडगे – प्रथम, जयराज दळवे – व्दितीय, सर्वेश गलांडे – तृतीय यांनी यश प्राप्त केले आहे. १४ वर्षे वयोगट मुलीमध्ये स्वरा गपाट – प्रथम, संस्कृती पाटोळे – व्दितीय, अक्षदा घोलप – तृतीय तसेच १७ वर्षे वयोगट मुले मध्ये प्रणव वीर – प्रथम, कृष्णा भोरे – व्दितीय, आदित्य नलवडे – तृतीय, कृष्णा जाधव – चतुर्थ तसेच मुलीमध्ये साक्षी खुळे – प्रथम व १९ वर्षे वयोगट मुलीमध्ये सृष्टी चांदगुडे – प्रथम, संयुक्ता सोनके – व्दितीय यांनी यश प्राप्त केले आहे. यशस्वी सर्व खेळाडूंचे अभिनंदन संस्थेचे चेअरमन व माजी आमदार जयवंतराव जगताप, माजी नगराध्यक्ष वैभवराजे जगताप, विश्वस्त




शंभुराजे जगताप यांनी केले. मुख्याध्यापक पोपट कापले, उपमुख्याध्यापक बागवान सर, पर्यवेक्षक बी.के.पाटील, पर्यवेक्षिका सौ.नवले, ज्यु.कॉलेज विभागप्रमुख विजय पवार यांनी खेळाडूंचे गुलाबपुष्प देऊन अभिनंदन केले. सर्व यशस्वी खेळाडूंना क्रिडा शिक्षक दळवे सर यांचे मार्गदर्शन लाभले.

# प्रेरणा मानव विकास प्रतिष्ठान तर्फे उपक्रमशील शिक्षकांचा सन्मान

करमाळा(सं.प्र.) : रावगाव येथील प्रेरणा मानव विकास प्रतिष्ठानच्या वतीने शिक्षक दिनी प्राथमिक व माध्यमिक शाळेतील उपक्रमशील शिक्षकांचा पुरस्कार देऊन सन्मान केला जाणार आहे; अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष रामदास कांबळे यांनी दिली.

याबाबत माहिती देताना कांबळे म्हणाले, की शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या जीवनातील अविभाज्य घटक आहेत. शिक्षण प्रक्रियेत विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया मजबुत करण्याचे कार्य शिक्षक हे करत असतात. ज्या वयामध्ये मुलांना जीवन जगण्याचे ज्ञान नसते, अशा वयात शिक्षक मुलांना जगण्याचे व ज्ञानाचे धडे देऊन त्यांच्या जीवनाचा पाया मजबुत करण्याचे कार्य करतात. त्यामुळे प्रेरणा मानव विकास प्रतिष्ठानने यावर्षी शिक्षक दिनी तालुक्यातील उपक्रमशील शिक्षकांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्याचे ठरविले आहे. त्यानुसार प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांनी ३१ ऑगस्ट पर्यंत आपले प्रस्ताव संस्थेकडे सादर करावेत. अधिक माहितीसाठी भ्रमणध्वनी ९३५९१९३७३ या क्रमांकाशी संपर्क साधावा; असेही आवाहन संस्थेचे अध्यक्ष रामदास कांबळे यांनी केले आहे.

# लिटल एंजल स्कुलमध्ये ध्वजारोहण संपन्न

करमाळा : जेऊर येथील लिटल एंजल स्कुल व अटल ज्ञानप्रबोधिनी येथे स्टेट बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापक कुमोद मेढे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष परेशकुमार दोशी होते. यावेळी लहान मुलांनी पर्यावरण रक्षण विषयासंदर्भात मुकनाट्य सादर केले. याप्रसंगी डी.जी.ठोंबरे, डॉ.पराग दोशी, प्रसन्न बलदोटा, नितीन मेहता, उमेश पाथ्रुडकर, सुभाष इंगोले, धनेश बलदोटा आदी उपस्थित होते.

# एम.बी.नुस्ते विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

करमाळा : पांगरे येथील मच्छिंद्र नुस्ते विद्यालय व ज्यु.कॉलेज येथे स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष एम.बी.नुस्ते यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष व प्रसिध्द व्यापारी परेशकुमार दोशी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांची देशभक्तीपर भाषणे झाली.


# खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविणेत येते की..

मिळकतीचे वर्णन – डि.सोलापूर सब डि.व ता.करमाळा पैकी करमाळा ग्रामीण हद्दीतील क.ग.नं.३००/२/क क्षेत्र – १ हे. ०६ आर, पो.ख. ०० हे. ०७ आर, असे एकूण क्षेत्र १ हे. १३ आर पैकी हर्षद हरिश्चंद्र गाढवे यांचे मालकी व कब्जेवहिवाटीचे ०० हे. १० आर येणेप्रमाणे मिळकत असे. वरील वर्णन केलेली मिळकत ही हर्षद हरिश्चंद्र गाढवे यांचे मालकीची व कब्जेवहिवाटीची मिळकत आहे. सदरची मिळकत ही आमचे अशिल हे खरेदी घेण्याच्या विचारात आहेत. त्याबाबत आमचे अशिल यांनी कागदपत्रांची पाहणी करून तशी बोलणी करून विसार दिलेला आहे. सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी आमचे अशिल यांना दिलेली आहे. सदर मिळकतीवर कोणाचाही हक्क, अधिकार, बक्षीस, गहाण, दान, लिज, पोटगी, खरेदी, साठेखत, करार, कुळ वहिवाट, इसार पावती, न्यायालयीन दावे,कोर्ट केसेस, बँकेच्या केसेस, पोटगी – बोजा इ. कोणत्याही स्वरूपाचा हक्क संबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील नमूद पत्त्यावर मुळ कागदपत्रानिशी आमचे अशिलाची खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास सदर मिळकतीत असे कोणाचेही हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची आहे; असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीची खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही, कसलीही तक्रार, हरकत आल्यास ती आमचे अशिलांवर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही; याची नोंद घ्यावी. ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. ता.१७/८/२०२३

अशिला तर्फे ॲडव्होकेट
श्री.राकेश डी.देशमुख, विद्यानगर
करमाळा. (मो.७५८८५०५२४०)

# धोंडेजेवण...



पाहुणा आपल्या घरी आल्यानंतर परत कितीच्या गाडीने जाणार.. असे विचारण्याचा हा जमाना आहे आणि या जमान्यात धोंड्याचा महिना आला आहे. धोंड्याचा महिना म्हणजे जावयांची चंगळ असे म्हटले जाते. अर्थातच सोन्याने मोठा विक्रमी आकडा म्हणजे ६२ ते ६५ हजार रूपये तोळा गेल्याने सोन्याविना धोंडा अशी स्थिती निर्माण झाली आहे. खरंतर धोंड्याच्या महिन्यात मुलगी, जावई आणि जमलंच तर त्यांचा परिवार यांना बोलावले जाते. असे असलेतरी या गोष्टीला पोथरे येथील अनिल महादेव झिंजाडे हे अपवाद आहेत.

रविवारी सकाळपासूनच अनिल झिंजाडे यांचे फोन सुरू झाले आणि आज घरी यायचं म्हणजे यायचं ! असं ठणकावून सांगितलं. मी जरा वेगळीच वेळ दिली. सायंकाळी पाच वाजता येतो म्हणून सांगितले आणि नाना महाराज पठाडे यांचेसोबत बरोबर पाच वाजता अनिलच्या घरी गेलो. त्यावेळी तेथे अनिलचे वडील महादेव आण्णा झिंजाडे, आई मीराबाई झिंजाडे, भाऊ संतोष, धनंजय व परिवारातील सर्वचजण स्वागताला हजर होते. घराच्या अंगणात कॉटवरती बसलो असतानाच हरिश्चंद्र दादा झिंजाडे, दादासाहेब रोही, शिवाप्पा झिंजाडे, रघुवीर जाधव, अशोक झिंजाडे, नितीन साळुंके, धनराज

## माझी डायरी

झिंजाडे, महादेव शिंदे, भरत जाधव आदी मंडळी आली. त्यानंतर मस्तपैकी गप्पा सुरू झाल्या. त्यावेळी अनिलचे मुले सोनाली, आदित्य आणि केशव तसेच धनंजयचे मुले सुवर्णा, सरिता आणि यशराज तर संतोषची मुले वैष्णवी, अश्विनी, आदिती, भारती आणि सोहम ही जमा झाली. छोट्यांबरोबर मस्त गप्पा झाल्या. छोटी मुलं मोठं स्वप्नं घेऊन कशा पध्दतीनं स्वत:चे भविष्य सांगतात, याची प्रचिती आली. त्याचवेळी संतोष झिंजाडे यांच्या पत्नी सौ.मालन, धनंजय यांच्या पत्नी सौ.सुवर्णा व अनिल यांच्या पत्नी सौ.सोनाली या तरूण मुली आपलं घर, शेती सांभाळत परिवाराचा समन्वय कसा सांभाळतात याची प्रचिती आली. तर या सर्वांना मार्गदर्शन करण्यासाठी अंतिकाबाई याही त्यावेळी भेटल्या. गप्पा झाल्यानंतर महादेव आण्णा यांनी चला जेवायला बसायचंय.. असं सांगून सर्वांना जेवायला बसवलं. तेव्हा जवळपास १५ ते २० जणांची पंगत धोंडे जेवणासाठी बसली होती. (आमच्यानंतर आणखीन एक पंगत होणार होती) विशेष म्हणजे ही सगळी बच्चे कंपनी जेवण वाढत होती. अतिशय शिताफीने कोठेही सांडलवंड होणार नाही, अन्न वाया जाणार नाही याची काळजी घेत सर्वांना आग्रह करून ही मुलं जेवायला वाढत होती. अलिकडच्या जमान्यात एक पाहुणा जड होत असताना बाहेरच्या ३०-३५ जणांना व परिवारातील १५-२० जण असे सर्वजण धोंडे जेवणासाठी एकाचवेळी होते. ही बाब वाखणण्यासारखी आहे व जुन्या जमान्यातील परंपरा महादेव आण्णा झिंजाडे यांनी चालू ठेवली हे विशेष !

धोंड्याच्या महिन्यात एकाच ठिकाणी जाऊन आलो, परंतू हे धोंडे जेवण नक्कीच लक्षात राहण्यासारखे आहे.

# आंतरराष्ट्रीय स्तरावर मुथा अबॅकस अॅकडमीची गरूड भरारी !

करमाळा(सं.प्र.) : अॅरिस्टो किडस् अंतर्गत २९ व ३० जुलै रोजी झालेल्या अबॅकस व वैदिक मॅथ आंतरराष्ट्रीय स्पर्धेत करमाळा येथील मुथा अबॅकस अॅकडमी मधून ७३ विद्यार्थ्यांनी विविध लेवल मधून सहभाग नोंदवला. या परीक्षेमध्ये सर्व विद्यार्थ्यांना सात मिनिटात शंभर अचुक गणिते सोडवणे अनिवार्य होते. या परीक्षेचा सराव होण्यासाठी अनलिमिटेड मॉक टेस्ट प्रोव्हाइड करण्यात आलेल्या होत्या. या संधीचा फायदा घेऊन विद्यार्थ्यांनी भरपूर प्रयत्न व मेहनत घेऊन यशाची उंची गाठली. या परीक्षेचा अंतिम निकाल १३ ऑगस्ट रोजी यशकल्याणी सेवाभावी सदन येथे ऑनलाइन झुमद्वारे घोषित झाला. या परीक्षेला २५ देशातून व महाराष्ट्र राज्यातून ३५० अॅकडमीचे विद्यार्थी सहभागी झाले होते. सर्वात जास्त बक्षीसे मिळवणारी करमाळा येथील मुथा अबॅकस अॅकडमीचे विशेष कौतुकही करण्यात आले. अबॅकस हा विद्यार्थ्यांची बौध्दीक क्षमता वाढवणारा कोर्स आहे. यामधून विद्यार्थ्यांची शालेय अभ्यासात सुध्दा अपेक्षेपेक्षा जास्त प्रगती होते. गणित हा विषय त्यांना अत्यंत सोपा जातो व कमी वेळेत अचूक उत्तरे विद्यार्थ्यांना काढण्यास मदत होते. स्पर्धात्मक परीक्षेमध्ये गणिते सोडवण्याच्या वेळेचीही बचत होते; असे मुथा अॅकडमीच्या ज्योती मुथा यांनी सांगितले.

**अबॅकस :** प्रथम, द्वितीय व तृतीय विद्यार्थी अनुक्रमे आदित्य कापसे, हर्ष शहा, सार्थक वनारसे. तसेच जोया शेख, खुशी शहा, प्रथमेश घाडगे, सृष्टी कामटे, जैद शेख, समीक्षा थोरे, शरयू फरतडे, ओम खाडे, सई पडवळे, अथर्व शहा, विश्वजीत कामटे, हर्षल सोळंकी, तनिष तळेकर.

**वैदिक मॅथ :** प्रथम रँक - आदित्य सोनी, हर्षवर्धन ओहोळ, सार्थक वनारसे, आदित्य कापसे, हर्ष शहा, प्रथमेश घाडगे.

**शायनिंग स्टार अवॉर्ड -** यश शहा, सादिया बागवान, जानवी लोकरे, संग्राम लावंड, स्वप्निल कुदळे, साई काळे, नीरज सागडे, प्रगती देशमुख, कृष्णा देशमुख, धूर्वी खटके, आदिल शेख, श्रेयस पवार, मेधा मुथा, आर्यन कापसे.

**बेस्त परफॉर्मन्स अवॉर्ड -** आर्या फंड, श्रावणी गवळी, हिबा कबीर, महेक नहार, स्पंदन घरबुडे

**इतर सहभागी विद्यार्थी -** समर्थ शिंदे, आर्यन रोकडे, गिरीशा मुथा, जयदेव भिंगारे, मनस्वी पोतदार, ओजस गांधी, स्वराज जाधव, अभिराज माने. या सर्व विद्यार्थ्यांना मुथा अबॅकस अॅकडमीच्या संचालिका ज्योती मुथा यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व विद्यार्थ्यांचे बक्षीस वितरण सोहळा यशकल्याणी सेवा सदन येथे ट्रॉफी मिळाल्या नंतर त्यांना सर्वांना देण्यात येणार आहे.

# पाण्यासाठी महिलांचा आक्रोश - पालिकेवर काढला घागर मोर्चा




करमाळा (सं.प्र.) : मोहल्ला गल्ली, माळी गल्लीत अपुरा व कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने संतप्त महिलांनी फारूक जमादार यांचे नेतृत्वाखाली करमाळा नगरपरिषदेच्या कार्यालयावर घागर मोर्चा काढला. तसेच पाणीपुरवठा अधिकाऱ्यास घेराव घालून जाब विचारला. आठ दिवसात पूर्ण दाबाने पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास सामुदायिकपणे पाणीपट्टी भरणार नसल्याचा इशारा दिला आहे.

करमाळा शहरातील प्रभाग एक मधील मोहल्ला गल्ली, माळी गल्ली येथील पाणीपुरवठा गेल्या सहा महिन्यापासून विस्कळीत झाला आहे. दररोज पाणीपुरवठा न होता दोन ते तीन दिवसाआड तोही कमी दाबाने होत असल्याने नागरीकांना तीव्र पाणी टंचाईस तोंड द्यावे लागत होते. याबाबत वारंवार तक्रारी करूनही नगरपरिषद याकडे दुर्लक्ष करत होती. त्यामुळे महिलांनी न.पा.पाणीपुरवठा अधिकारी फिरोज शेख यांची भेट घेऊन पाणी टंचाईचा जाब विचारत पाणी पुरवठा सुरळीत करण्याचे लेखी निवेदन दिले.

करमाळा नगरपालिके सध्या प्रशासक असून भोंगळ कारभारामुळे जनता व्याकुळ झाली आहे. मोहल्ला, माळी गल्ली भागातील पाणीपुरवठा सुरळीत झाला नाहीतर मुस्लिम भगिणी पालिकेच्या दारात थाळी नाद आंदोलन करणार असल्याचा सशारा अर्बन बँकेचे माजी संचालक फारूक जमादार यांनी दिला आहे.

# कोंढारचिंचोली शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप

करमाळा(सं.प्र.): कोंढारचिंचोली जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शांताई ग्रुप हडपसर पुणे यांच्या वतीने संजयकुमार भोसले, संतोष भोसले यांच्या मातोश्री स्व.शालन भानुदास भोसले यांचे स्मरणार्थ गरजू विद्यार्थ्यांना १२ सायकलचे वाटप करण्यात आले. यावेळी प्रमोद भोसले, राजेंद्र गलांडे, सरपंच शरद भोसले, नाथसाहेब गलांडे, सुहास गलांडे, नंदकुमार भोसले, अरूण गोडगे, देविदास साळुंके, नीलकंठ शिंदे, राम पाडुळे यांचेसह मुख्याध्यापक शिक्षक उपस्थित होते.


सस्नेह निमंत्रण
।। श्री गजानन प्रसन्न ।।
सप्रेम नमस्कार वि.वि. आमचे येथे
धर्मसंगीत
लॉन्स मंगल कार्यालय
।। उद्घाटन समारंभ ।।
शनिवार दि.१९/८/२०२३ रोजी सायं ५ वा. ३० मि. या शुभमुहूर्तावर
करमाळा तालुक्याचे लोकप्रिय आमदार
मा.श्री.संजयमामा शिंदे यांचे शुभहस्ते संपन्न होणार आहे. त्यानिमित्त
ह.भ.प.माऊली महाराज पठाडे यांचे सुश्राव्य किर्तन सेवा आयोजित करण्यात आली असून स्नेहभोजन व शुभकार्यप्रसंगी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे !
प्रमुख उपस्थिती
मा.डॉ.शहाजी सोळुंके (मा.विशेष पोलीस सहनिरीक्षक IPS म.राज्य)
मा.रोहित(दादा) पवार (आमदार, कर्जत-जामखेड)
मा.डॉ.शिरीष देशपांडे (IPS जिल्हा पोलीसप्रमुख सोलापूर ग्रा.)
मा.जयवंतराव जगताप (माजी आमदार, करमाळा)
मा.अजित पाटील (DYPS करमाळा डि.व्ही. सोलापूर ग्रा.)
मा.नारायण(आबा) पाटील (माजी आमदार, करमाळा)
मा.नवनाथ घोगरे (सहा. पोलीस आयुक्त DYPS)
श्रीमती शामलताई बागल (माजी आमदार, करमाळा.)
मा.ज्योतीराम गुंजवटे (व. पोलीस निरीक्षक, करमाळा)
मा.भरत लिमन (उद्योजक/अभिनेते)
सर्व नगरसेवक, नगरसेविका करमाळा नगरपरिषद तसेच सर्व राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, व्यापारी बंधू, सर्व सरकारी-निम सरकारी, अधिकारी व कर्मचारी वृंद तसेच सर्व नातेवाईक, आप्तेष्ट, सगेसोयरे., करमाळा तालुका मित्र परिवार, सोलापूर जिल्हा मित्र परिवार व पुणे-पिंपरी चिंचवड मित्र परिवार
तरी या कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे !
निमंत्रक
श्री.धर्मराज उर्फ आबासाहेब जनार्दन आवटे
श्री.विकास धर्मराज आवटे व समस्त आवटे परिवार
मो.9822600663, 8888832011
स्थळ : नागनाथ महाराज मंदिराजवळ
करमाळा-कर्जत रोड, करमाळा., जि.सोलापूर


स्व.सौ.स्मिता व श्री.अनंतराव दळगांवकर(सर) यांचे नातू तसेच श्री.नारायणराव विलासराव देशपांडे व सौ.अश्विनी नारायणराव देशपांडे यांचे चिरंजीव
चि.नचिकेत नारायण देशपांडे यांची इंजिनिअरींगच्या उच्च शिक्षणासाठी (M.S. इंडस्ट्रीयल इंजिनिअरींग) अमेरिका येथील युनिव्हर्सिटी ऑफ वीसकॉनसिन-मॅडसिन येथे निवड झाली असून, ते दि.२३ ऑगस्ट रोजी अमेरिका येथे जाणार आहेत.त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
श्री व सौ.कुलकर्णी आणि परिवार(ठाणे)
श्री व सौ.देशपांडे आणि परिवार (पुणे)
श्री व सौ.पुंडे आणि परिवार (पुणे)
श्री व सौ.भातखंडे आणि परिवार (पुणे)
श्रीमती चावरे आणि परिवार(करमाळा)


कै.गोविंद(बापू) पाटील
23 AUG
कर्तव्यदक्ष माजी आमदार
मा.श्री.नारायण(आबा) पाटील
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा...
शुभेच्छुक
नवनाथ(बापू) झोळ
मा.संचालक, श्री आदिनाथ सहकारी साखर कारखाना

## पोथरे ग्रामस्थांच्या आंदोलनास प्रतिसाद - दारू विक्रेत्यावर कारवाई

करमाळा(सं.प्र.) : पोथरे येथील ग्रामस्थांनी गावात दारूबंदी होण्यासाठी आंदोलनाचा इशारा दिला आहे. त्यानंतर पोलीस या गावात दारू विक्री होणार नाही, यासाठी जोरदार प्रयत्न करत आहेत. दरम्यान पोथरे येथील गायरान वस्तीवर दारू विक्री होत असल्याची माहिती मिळताच पोलीसांनी तेथे जाऊन दारू विक्रेत्यास रंगेहाथ पकडून त्यावर गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार ११ ऑगस्टला सायंकाळी पाच वाजता घडला आहे. या प्रकरणी पोलीस नाईक बालाजी केशव घोरपडे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की पोथरे हद्दीतील गायरान वाडीवर दिपक गोरख गायकवाड रा.पोथरे हा देशी दारू विक्री करत असल्याची माहिती मिळताच तेथे आम्ही छापा घातला असता, त्याच्याकडे देशी दारू संत्रा स्पेशलच्या ९१० रूपयाच्या १३ बाटल्या सापडल्या आहेत. या सर्व बाटल्या जप्त केल्या आहेत. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## फॉरच्युनरची नव्या टेम्पोला धडक - दोन्ही चालक जखमी

करमाळा (सं.प्र.): पुणेहून लातूरला जात असलेल्या अशोक लेलॅन्ड कंपनीच्या विना नंबरच्या नवीन टेम्पोला फॉरच्युनर गाडीने धडक देऊन झालेल्या अपघातात दोन्ही गाड्याचे नुकसान झाले असून दोन्ही गाड्याचे चालक जखमी झाले आहेत. हा अपघात ९ ऑगस्टला रात्री पावणेअकरा वाजता फिसरे गावाजवळ घडला आहे.

या प्रकरणी पुरूषोत्तम पंढरी भलावी (रा.पिंपळगाव ता.जि.भंडारा) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांनी म्हटले आहे, की मी कंपनीचा नवीन टेम्पो डिलीवरी करण्याचे काम करतो. चौफुला पुणे येथून नवीन टेम्पो लातूर येथे डिलीवरीसाठी घेऊन जात असताना करमाळा-बार्शी रस्त्यावरील फिसरे गावाच्या पुढे जात असताना बार्शीकडून काळ्या रंगाची फॉरच्युनर ही वेगात आली व त्याने टेम्पोच्या उजव्या साईडला जोराची धडक दिली. त्यामुळे टेम्पो रस्त्याच्या बाजुच्या चारीत जाऊन पलटी झाला. यात मी जखमी झालो असून समोरच्या फॉरच्युनर गाडी क्र.एमएच १४ केडब्लू ००४७ याचेही नुकसान झाले आहे व त्याचा चालकही जखमी झाला आहे.

या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस शिपाई प्रदीप चौधरी हे करत आहेत.

## जबरदस्तीने अतिक्रमण करणाऱ्याविरूध्द गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : रस्त्याच्या कारणासाठी जबरदस्तीने जमीनीत अतिक्रमण करून दमदाटी करणाऱ्या विरूध्द करमाळा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार जेऊर येथे ९ ऑगस्टला सकाळी अकरा वाजता झाला आहे. या प्रकरणी नामदेव तुकाराम गुंजाळ (रा.जेऊर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की जेऊर येथील जमीन गट नं.७७ अ मध्ये पेरणीचे काम चालू असताना जेऊर येथील किसन माने व त्याची पत्नी (नाव माहित नाही) व एक अनोळखी गडी तिघांनी मिळून ९ ऑगस्टला सकाळी अकरा वाजता आमच्या मालकीच्या जमिनीत दक्षिण-उत्तर चालीचा १० फुट बाय २५० फुट रस्त्यासाठी धाक दपटशाही दाखवून अतिक्रमण करून जीवे मारण्याची धमकी दिली आहे.

या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस शिपाई चेतन पाटील हे करत आहेत.

## कुटीर रूग्णालयातील कॉपरच्या पाईपची चोरी

करमाळा(सं.प्र.) : येथील कुटीर रूग्णालयातील ऑक्सिजन प्लँट पासून रूग्णालय पर्यंत जाणारा १८ फुट लांबीचा २७०० रूपये किंमती १ इंच जाडीचा कॉपरचा पाईप अज्ञात चोरट्याने चोरून नेला आहे. ही चोरी ११ ऑगस्टला उघडकीस आली आहे. या प्रकरणी कुटीर रूग्णालयाचे कनिष्ठ लिपिक सुहास सुरेश आगलावे यांनी फिर्याद दिली आहे. पोलीसांनी यात गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.



स्व. मदनदासजी देवी यांच्या कुटुंबीयांच्या सांत्वनपर भेटीप्रसंगी जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, माजी मंत्री विनोद तावडे, खुशालदास देवी, डॉ. श्रीराम परदेशी, आ. सचिन कल्याणशेट्टी, राधेशाम देवी आदी.

## तालुक्याच्या राजकारणातील
# 'शेलारमामा' काळाच्या पडद्याआड !



छत्रपती शिवरायांच्या अनेक लढायापैकी कोंढाण्याची लढाई गाजली व स्मरणात आहे. या कोंढाण्याच्या लढाईत तानाजी मालुसरे गेले. त्याचवेळी गडही गेला असता, पण शेलारमामा मुळे मराठे सैन्य एकटवले. पुन्हा जोरदार झुंज होऊन कोंढाणा सर केला. कोंढाण्यामुळे शेलारमामा हे अजरामर झाले आहेत. अशाचप्रकारे करमाळा तालुक्याच्या राजकारणात ज्यांनी शेलारमामाची भुमिका पार पाडून या राजकारणाच्या इतिहासात आपले नांव कोरले आहे, असे झरे या गावचे श्रीराम उर्फ विलासराव आनंदराव पाटील यांचे वयाच्या ९३ वर्षी १८ ऑगस्ट २०२३ रोजी देहवासन झाले आहे.

सन १९४९-५० पासून ते राजकारणात होते. स्वातंत्र सैनिक व माजी आमदार कै.नामदेवराव जगताप, माजी आमदार कै.रावसाहेब पाटील, माजी मंत्री कै.दिगंबरराव बागल मामा तसेच माजी आमदार शामलताई बागल व विद्यमान आमदार संजयमामा शिंदे यांचे सोबत त्यांचा राजकीय प्रवास झालेला आहे. तालुक्याच्या राजकारणात विलासराव पाटील हे जेवढे आदरणीय आहेत तेवढेच सुसंस्कृत नेता म्हणून त्यांची ओळख होती. प्रत्येकाशी प्रेमानं बोलणं, अनेकांशी ओळख करून घेणं, ओळख टिकवणं आणि योग्य ठिकाणी योग्य मार्गदर्शन करणं हे त्यांचं वेगळंपण होतं. अलिकडे वयपरत्वे राजकारणात ते नसलेतरी अनेक राजकीय नेते त्यांच्या भेटीला जाऊन मार्गदर्शन घेत होते.

घरामध्ये बसूनही तालुक्याच्या राजकारणाला दिशा देण्याचं काम ते करत होते. त्यांचे चिरंजीव माजी कृषी अधिकारी बाळासाहेब पाटील, पोलीस पाटील हनुमंतराव पाटील, नातू वमाजी सरपंच प्रशांत पाटील यांनी पाटलांना त्यांच्या मर्जीनूसार व विचारानूसार सतत प्रवाहीत ठेवले होते. त्यांना दोन मुले व चार मुली असा परिवार असून त्यातील थोरल्या कन्या अक्कासाहेब वाळुंजकर (जवळा), लताताई अंगद साळुंके (कुंभेज), सुनिताताई रमेशराव शिंदे (इंदापूर) तर निर्मला देवकर (देवकरलोणी) या आपापल्या परिवारात व्यस्त आहेत. वर्षातून एकदा सर्व परिवार एकत्र आणणे तसेच गावकरीही एकत्र आणण्याची पाटलांनी वेगळी परंपरा सुरू केली होती. गावातील आणि तालुक्यातील पाटलांचे सहकारी यापूर्वीच त्यांना सोडून गेले होते परंतू जिद्द व आत्मविश्वास या जोरावर पाटील यांनी तालुक्यात शेलारमामा म्हणून मजबुतपणे लढत दिली. त्यांची स्मरणशक्ती दांडगी होती. तालुक्यातील प्रत्येक निवडणुकीचा ते आढावा संगणकाप्रमाणे पटपट सांगत होते; हे त्यांचे वेगळेपण होते. अशा या राजकारणातील शेलारमामांना अचानक देवाज्ञा झाली आहे. खरंतर तालुका एका सुसंस्कृत व विचारी नेत्याला मुकला आहे. आले किती गेले किती, परि या सम हाच । अशा उक्तीप्रमाणे पाटलांची सर कोणालाच येणार नाही. त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली !

झरे गावचे ३५ वर्षे पोलीस पाटील , ५० वर्षे सोसायटीचे चेअरमन आणि अपवाद वगळता सतत गावची ग्रामपंचायत आपल्या ताब्यात ठेवणारे पंचायत समितीचे सदस्य, उपसभापती तसेच बाजार समितीचे संचालक, आदिनाथचे संचालक, जिल्हा सहकारी बोर्डाचे उपाध्यक्ष अशा विविध सत्तावर आपला ठसा उमटविणारे, एवढेच नाहीतर तालुक्याच्या राजकारणात कोणाला आमदार करायचे.. ही भुमिका यशस्वीपणे पार पाडणारे एक राजकीय धूरंदर म्हणून विलासराव पाटील यांची ओळख होती.

सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी २०० रू.


सस्नेह निमंत्रण
श्री कमलाभवानी प्रसन्न
श्री गणेश प्रसन्न
सप्रेम नमस्कार वि.वि. आमचे येथे श्रीहरी कृपेने..
चि.सौ.कां.नम्रता
कै.बाळासाहेब नागनाथ घोलप यांची नात व श्री.नितीन बाळासाहेब घोलप रा.करमाळा यांची सुकन्या
चि.आदित्य
कै.माणिकराव गणपतराव गुंजवटे यांचे नातू व श्री.जोतीराम माणिकराव गुंजवटे (वरीष्ठ पोलीस निरीक्षक करमाळा) रा.फलटण, जि.सातारा यांचे चिरंजीव
यांचा शुभविवाह सोहळा
मंगळवार दि.२२/८/२०२३ रोजी सायं. ५ वा. ४० मि.
या गोरज मुहूर्तावर करण्याचे योजिले आहे. तरी वधू-वरांस शुभाशिर्वाद देण्यासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे !
विवाहस्थळ
राधेश्याम सुंदर मंगल कार्यालय
झरे फाटा, जेऊर रोड
ता.करमाळा.
आपले नम्र
सौ.साधना नितीन श्री.नितीन बाळासाहेब घोलप
समस्त घोलप परिवार
करमाळा.
टीप : सर्वांना निमंत्रण पत्रिका दिलेल्या आहेतच. नजरचुकीने कोणास निमंत्रण पत्रिका मिळाली नसल्यास हेच निमंत्रण समजून शुभकार्यास अगत्य येण्याचे करावे, ही नम्र विनंती !


जनतेचे आमदार
सर्पनाथ महाराज
आशिर्वाद
आशिर्वाद
युवक नेते
मा.सभपाती, पं.स.
सचिव, भा.शि.प्र.मंडळ
तालुक्याचे युवा नेते
सत्कारमुर्ती
जनतेचे आमदार, दहिगाव योजनेचे प्रणेते, लोकनेते
मा.श्री.नारायण(आबा) पाटील यांना
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा ! तसेच सरपडोह गावचे सुपुत्र
श्री.सागर जयवंत पवार यांची पोलिस उपनिरीक्षक पदी
निवड झाल्याबद्दल...
हार्दिक अभिनंदन !
श्री.सागर जयवंत पवार
(नूतन पोलिस उपनिरीक्षक)
समर्थ साथ
श्री.नाथराव बाळनाथ रंदवे
(उपसरपंच, सरपडोह)
सरपंच
ग्रा.पं.सदस्या
ग्रा.पं.सदस्य
ग्रा.पं.सदस्य
ग्रा.पं.सदस्य
अध्यक्ष, शाळा व्य.समिती
सौ.मालन पांडुरंग वाळके
सौ.अर्चना बाळासाो गवारे
श्री.दत्तात्रय शिवाजी मोरे
श्री.शहाजी बापू मारकड
श्री.भानुदास अनंता शिंदे
श्री.शरद अशोक घोगरे
श्री.उत्तम गायकवाड
श्री.रमेश गोविंद जानभरे
श्री.मारुती बबन यादव
श्री.विनायक आण्णा पवार
श्री.सागर पांडूरंग भिताडे
श्री.हनुमंत नागनाथ रंदवे
चि.सागर संतोष आरणे
श्री.रविंद्र मधुकर नांगरे
श्री.दत्तात्रय महादेव भिताडे
श्री.अशोक महादेव रंदवे
श्री.विठ्ठल क्षीरसागर
शुभेच्छुक
ग्रामपंचायत सरपडोह व ग्रामस्थ
सरपडोह, ता.करमाळा